**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रोडगे प्रभाकर किशनराव, : अपिलार्थी
रा. लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड - श्री. हाशमी सय्यद गौस मोहियोद्दिन | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड - श्री. सानप सुखदेव राजाराम | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १२.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०८.२०१० |

या प्रकरणाची यापूर्वी दि. २६.०८.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली होती, त्यावेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती सन १९७४-७५ सालची जुनी अशी असल्याने तसेच अपिलार्थी हे ज्येष्ठ नागरिक असल्याने त्यांना प्राप्त व्हावयाच्या राहिलेल्या उर्वरित माहितीचा जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी शोध घेऊन ती संकलित करण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानंतर दि. १५.०२.२०१२ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची आयोगातर्फे गंभीर दखल घेण्यात आली होती व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.बीड यांना त्यांची बाजू मांडण्याची पुन्हा एक संधी देण्याकरिता सुनावणीची तारीख दि. २०.०३.२०१२ अशी निश्चित करण्यात आली.

त्यानुसार आज रोजी सुनावणी घेण्यात येत आहेत. आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी प्रकृती अस्वास्थ्यामुळे अनुपस्थित आहेत.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या दिलेल्या निदेशानुसार संपूर्ण कार्यवाही जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी केल्याचे दिसून येत आहे. इतर कार्यालयाकडे पत्र देऊन कर्मचारी पाठविण्यात आले होते. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांना दि. २४.०२.२०१२ रोजीच्या पत्रान्वये दि. २७.०२.२०१२ ते ०३.०३.२०१२ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे अवलोकन करण्यात यावे, असेही कळविण्यात आले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी ज्येष्ठ नागरिक असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सर्वंकष प्रयत्न केलेले आहेत. जी माहिती उपलब्ध आहे, ती अपिलार्थीस देण्यात आली असल्यामुळे या टप्प्यावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रोडगे प्रभाकर किसनराव, साईधाम, खाडगाव रोड, बंगला नं.१६, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मशायक सैय्यद अयाज अब्दुल हलीम, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१११४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मशायक सैय्यद अयाज अब्दुल हलीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपआयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०२.२००९ (फेरसादर दि.२९.०४.२०११) |

यापूर्वी या प्रकरणात दि. २४.०२.२०१२ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाच्या सूचनेनुसार मागितलेल्या माहितीची व्याप्ती कमी करुन खालील माहिती मिळावी अशी विनंती केली होती.

१) मुख्यमंत्री कार्यालयाच्या दिनांक ३०.०३.२००१ रोजीच्या पत्रान्वये आदेशित करण्यात आले होते की, अशाप्रकारे रोजंदारीवर काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यात यावे, या पत्राची प्रत.

२) दिनांक ०१.०२.२००३ रोजी विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी आदेश निर्गमित केलेले आहेत. त्याचप्रमाणे दिनांक ११.०३.२००३ रोजी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना कळविले आहे. या पत्रावर नगर परिषद, उस्मानाबाद यांनी केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील पत्राच्या प्रती तसेच टिपणीच्या प्रती.

३) दिनांक ०१.०१.१९९० ते २५.०८.२००९ पर्यंत या कालावधीत रोजंदारीवर नगर परिषद, उस्मानाबाद येथे कार्यरत होते या कालावधीत त्यांनी स्वाक्षरी केलेल्या हजेरीपटाच्या सत्यप्रती.

४) नगर परिषद, उस्मानाबाद मार्फत दिनांक १६.०९.२००३ रोजी पत्र पाठविण्यात आले आहे. त्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील पत्राच्या प्रती.

ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. त्याचबरोबर अपिलार्थी यांच्या स्वतःच्या सेवेसंदर्भातील आहे तसेच अपिलार्थी हे शारीरिकदृष्टया विकलांग असल्यामुळे आयोगातर्फे पुढील तारीख दि. २०.०३.२०१२ अशी निश्चित करण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांना समक्ष उपस्थित राहण्याच्या सूचना आयोगातर्फे देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे सुनावणीची पुढील तारीख दि. ०५.०६.२०१२ अशी निश्चित करण्यात येत आहे. या बाबीची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी, असे आयोगाचे निदेश आहेत. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. ०५.०६.२०१२ रोजी सकाळी ११.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद, जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग,विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मशायक सैय्यद अयाज अब्दुल हलीम, घर नंबर १५/७७, मशायक मोहल्ला, मिनारा मस्जिदच्या पाठीमागे, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सफियोद्दीन वलियोद्दीन काझी, : अपिलार्थी
रा.गंगाखेड,जि. परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सफियोद्दीन वलियोद्दीन काझी | : | उपस्थित |
| | अपिलार्थी यांचे वकील ॲड. सुधीर चव्हाण | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.०३.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.०५.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०११ |

यापूर्वी या प्रकरणात दि. ०३.०८.२०११ व १६.०२.२०१२ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. प्रकरणात जन अपिलीय अधिकारी यांच्या विशेष साक्षीकरिता आयोगातर्फे पुढील तारीख दि. २०.०३.२०१२ निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत

आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी व त्यांचे वकील उपस्थित आहेत. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. या बाबीची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी, असे आयोगाचे निदेश आहेत. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २६.०४.२०१२ रोजी सकाळी ११.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सफियोद्दीन वलियोद्दीन काझी,रा.सिव्हील कोर्टाच्या पाठीमागे,गंगाखेड,जि. परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरवसे श्रीराम सोपानराव, : अपिलार्थी
रा.देवगाव, पो. काडीवडगाव, ता.वडवणी,जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जि.बीड - श्री. जायभाये रतन सावळाराम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड - श्री. सानप सुखदेव राजाराम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी बीड जिल्हयातील प्राथमिक शाळेत रुपांतरित झालेल्या वस्तीशाळांसंदर्भातील एकूण चार मुद्यांवर माहिती मागितली आहे. ही माहिती अपिलार्थी व्यक्तिशः घेणार होते. तत्कालीन माहिती अधिकारी यांच्यातर्फे अपिलार्थीस माहिती दिली आहे किंवा कसे हे कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तथापि आता सर्व माहिती संकलीत करुन अपिलार्थीस दि. १५.०३.२०१२ रोजी दिली आहे. अपिलार्थी यांनी पोच दिली आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती देण्यास विलंब झालेला आहे. याकरिता या प्रकरणाशी संबंधित दि. ०१.०९.२००९ पासून पुढे कार्यरत जन माहिती अधिकारी या पदावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सक्त ताकीद देण्याची आवश्यकता आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी या प्रकरणाशी संबंधित दि. ०१.०९.२००९ पासून पुढे कार्यरत जन माहिती अधिकारी या पदावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सक्त ताकीद द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरवसे श्रीराम सोपानराव,रा.देवगाव, पो. काडीवडगाव, ता.वडवणी,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अहेमदखॉ करीमखॉ पठाण, : अपिलार्थी
रा.अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई,जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई,जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अहेमदखॉ करीमखॉ पठाण | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालय अधीक्षक, नगर परिषद अंबाजोगाई - श्री. चव्हाण आत्माराम जीवनराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी,नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई,जि.बीड - श्री. पोशेट्टी शाम लक्ष्मणराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे संबंधितांनी त्यांची बाजू मांडली. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी अंबाजोगाई- मंडी बाजार येथील जूना मालमत्ता/मिळकत क्र. १/८४ व नवीन मालमत्ता मिळकत क्र.१/८६ संदर्भातील कागदपत्रांची मागणी केली आहे. अपिलार्थी यांच्या दि. १४.१०.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंदर्भात  अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद, अंबाजोगाई, जि.बीड यांनी दि. ०३.११.२००९ रोजी विहित मुदतीत कळविलेले आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळालेली आहे, ही बाब  त्यांनी त्यांच्या युक्तिवादात मान्य केली आहे. अपिलार्थी यांना प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात त्यांना काही प्रशासकीय अडचणी असल्याचे दिसून आले. याबाबत त्यांना स्वतंत्रपणे अर्ज करुन त्यांच्या शंकांचे निरसन करुन घेणे क्रमप्राप्त आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अहेमदखॉ करीमखॉ पठाण,रा.खतीब गल्ली,अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद अंबाजोगाई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद कार्यालय,अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. काझी रऊफोद्दीन पि.काझी हिसामोद्दीन, : अपिलार्थी
रा. बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक,
सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक धर्मादाय आयुक्त, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बीड - श्री. जी.जी.सुर्यवंशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बीड- श्रीमती उषा धनाजी चव्हाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांनी अपिलार्थीच्या दि. २६.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांनी अपिलार्थीच्या दि.२६.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काझी रऊफोद्दीन पि.काझी हिसामोद्दीन,रा. ग्रामसेवक कॉलनी, नगर रोड, बीड

ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देशमुख जालींदर धोंडिराम, : अपिलार्थी
रा. मस्साजोग, ता. केज, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय,केज, जि.बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, जि.बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६०० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. देशमुख जालींदर धोंडिराम | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,केज, जि.बीड - श्री. के. जी. बिरादार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, केज, जि.बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०४.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकूण दहा मुद्यांवर विस्तृत माहिती मागितली आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. माहितीचा अर्ज प्रभावी होण्याच्यादृष्टीने माहिती नेमकी मागणे आवश्यक असते. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगासमोर माहितीची व्याप्ती कमी करुन मुद्दा क्र. १ ते ६ संदर्भातील माहिती मिळावी, अशी विनंती केली. ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती अपिलार्थीस देण्याकरिता एका महिन्याचा कालावधी मिळण्याची विनंती केली. यासाठी सुनावणीची पुढील तारीख दि. २४.०४.२०१२ सकाळी ११.३० वा. अशी निश्चित करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, केज (श्री. भागवत देशमुख),जि.बीड यांना कार्यालय प्रमुख या नात्याने व्यक्तिशः उपस्थित राहावे, असे अधिनियमातील कलम 19(8)(a) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सूचित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २४.०४.२०१२ रोजी सकाळी ११.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २०-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देशमुख जालींदर धोंडिराम, मु.पो. मस्साजोग, ता.केज, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय,केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी, : अपिलार्थी
रा. बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गृहनिर्माण विभाग, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,पुणे
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था,पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गृहनिर्माण विभाग, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,पुणे | : | अनुपस्थित |
| ३.३ | गृहनिर्माण विभागाचे प्रतिनिधी - श्री. आर.के.चव्हाण, जिल्हा व्यवस्थापक, एम.एस.सी.एच.एफ.सी.लि.बीड | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था,पुणे - श्री. बी.आर. माळी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.०४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.०६.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.०६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२.०२.२००९

(पुणे खंडपीठाकडे प्राप्त)

२२.०२.२०१०

(औ.बाद खंडपीठाकडे प्राप्त)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये गृहनिर्माण/गृहतारण संस्था व दि महाराष्ट्र को-ऑप हौऊसिंग फायनान्स कार्पोरेशन लि. मुंबई या संस्थांनी वाटप केलेल्या कर्जाच्या परत फेडीच्या थकबाकी कर्जावर किती टक्के दंड व्याज आकारावे यासंदर्भात कार्यालयाने काढलेल्या परिपत्रकाची सत्यप्रती मागितल्या आहेत. माहितीचा कालावधी सन १९६० ते ३१.०३.२००८ असा दिलेला आहे. अपिलार्थी यांचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा गृह निर्माण विभाग, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांनी दि. ०७.०६.२००८ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी संचालक, दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप.हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशन म.मुंबई यांच्या कार्यालयाकडे वर्ग केलेला आहे व ही बाब अपिलार्थीस कळविण्यात आलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर उपलब्ध असलेली माहिती दि. २०.०६.२००८ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविलेली आहे व त्यासोबत हौऊसिंग फायनान्स कार्पोरेशनच्या नियमावलीची छायाप्रत देण्यात आली व कर्ज घेण्यासाठीच्या अटीशर्तीची प्रत देण्यात आली आहे. प्रसंगावशात, अपिलार्थी यांनी त्यांच्या वडिलांच्या कर्जाच्या प्रकरणात सदरचा अर्ज केलेला आहे. त्या कर्जाची आता परतफेड झालेली आहे. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती परिपत्रकाच्या स्वरुपात उपलब्ध नाही. अशाप्रकारच्या नियमांचे परिपत्रक काढलेले नाही. तथापि अपिलार्थी यांना अपेक्षित असलेली सर्व माहिती त्यांना देण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये समाविष्ट आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी, रत्नकुंज निवास, जवाहर कॉलनी, नगर रोड, बीड - ४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा गृहनिर्माण विभाग, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक (गृहनिर्माण), सहकारी संस्था,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद अनीसोद्दीन सय्यद सलाहोद्दीन, : अपिलार्थी
रा. अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
मा. शरदचंद्रजी पवार ऊर्दू प्राथमिक शाळा,
लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, मा. शरदचंद्रजी पवार ऊर्दू प्राथमिक शाळा,लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.शिवाजी खुडे, उपशिक्षणाधिकारी (प्रा.) | | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६.०२.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची पाहणी त्यांना देण्यात आलेली आहे व त्यांना हवी असलेली माहिती त्यांना मिळालेली आहे. याबाबत अपिलार्थी यांनी दि. १९.०३.२०१२ रोजी राज्य माहिती आयोगास द्वितीय अपील मागे घेत असल्याचे निवेदन सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, त्यांनी माहिती प्रत्यक्ष पाहिल्यामुळे व त्यांचे समाधान झाल्यामुळे अर्ज परत घेत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद अनीसोद्दीन सय्यद सलाहोद्दीन,गांधीनगर, अंबोजागाई, ता. अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मा. शरदचंद्रजी पवार ऊर्दू प्राथमिक शाळा,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. वीर आसाराम नरहरराव,<br>रा. बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ,<br>देवगिरी महाविद्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष,<br>मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, देवगिरी महाविद्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद यांचे वकील ॲड. भारड एस.आर. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद या संस्थेचे वकील ॲड.एस.आर.भारड उपस्थित आहेत.

त्यांनी आयोगासमोर त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, अपिलार्थी यांनी संस्थेच्या सचिवांकडे त्यांच्या दि.२९.१०.२००९ रोजीच्या माहिती अर्जावर माहिती मागितली आहे. सदरची माहिती शाळा न्यायाधिकरणाच्या संदर्भातील आहे. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद ही संस्था मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५० अंतर्गत नोंदणी झालेली आहे. या संस्थेस शासनाचे अनुदान प्राप्त होत नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे.

मा. उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने दि. २०.०८.२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे योग्य राहील. नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट पिटीशन क्र.५१३२/२००८, नगर युवक शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यासंदर्भात दि. २०.०८.२००९ रोजी अशाप्रकारच्या खाजगी संस्थांची महाविद्यालये माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) प्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरणा'च्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत, असा निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने, अधिनियमातील "नियंत्रण" व "मोठया प्रमाणात वित्त पुरवठा" या मुद्यावरही पुरेसे भाष्य केले असून खाजगी संस्थांच्या महाविद्यालयांवर माहिती अधिकार अधिनियमाद्वारे अभिप्रेत असलेले "नियंत्रण"व "वित्त सहाय्य" शासनाकडून केले जात नसल्याचा निर्णय दिला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मध्ये विहित केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अशाप्रकारची खाजगी महाविद्यालये येत नसल्यामुळे सदर अपील फेटाळून राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाचे अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेश रद्द ठरविले आहेत."

सदरील संस्थेस शासनाचे थेट अनुदान प्राप्त होत नाही, त्यामुळे संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. असे कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलात याच्या समर्थनार्थ काही नमूद केलेले दिसून येत नाही. तसेच अपिलार्थी यांनी संस्थेकडे माहितीचा अर्ज तसेच अपील अर्ज दाखल केलेला आहे.

या सर्व बाबी विचारात घेता प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वीर आसाराम नरहरराव, महाराष्ट्र हाऊसिंग कॉलनी, घर नं. ८३, स्वस्त धान्य दुकान नं. ३०च्या दक्षिणेस, धानोरा रोड, बीड.

२. सचिव,मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तांदळे उध्दव किसनराव, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सरपंच व ग्रामसेवक,
चुंबळी, पो. चिंचपुर ढगे, ता.भुम,
जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भूम, जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. तांदळे उध्दव किसनराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, चुंबळी, पो. चिंचपूर ढगे, ता.भूम, जि.उस्मानाबाद - श्री. एम.जी.रामोड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भूम, जि.बीड - श्री. आर. डी. मगर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२.०३.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे त्यामुळे त्यांनी आयोगास अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती केली.

या सर्व पार्श्वभूमीवर अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तांदळे उध्दव किसनराव, तांदळे निवास, हनुमान चौक, शाहुनगर, जालना रोड,बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, चुंबळी, पो. चिंचपूर ढगे, ता.भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, भूम, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अब्दुल हफिज सिद्दीकी,<br>रा. अंबाजोगाई, जि.बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उपमुख्य लेखा परिक्षक (क),<br>स्थानिक निधी लेखा कार्यालय,बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालय,बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अब्दुल हफिज सिद्दीकी | : | उपस्थित |
| ३.२ | सध्याचे जन माहिती अधिकारी - जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय, बीड - श्री. अ.ग. पिंगळे | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - श्री. एम.के. शेख | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, बीड - श्री. दा.सु.चव्हाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन २००० ते २००७ या कालावधीत नगर परिषद, अंबाजोगाई येथील अंतर्गत लेखापरिक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेदाबाबत नगर परिषद कार्यालयाशी केलेल्या संपूर्ण पत्रव्यवहाराच्या प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती संकलीत करुन दि. ०८.०२.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दि. २२.०२.२०१० रोजी खासदूतामार्फत देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी माहिती प्रत्यक्ष घेतली आहे व त्यासंदर्भातील पोच दिली आहे. असे जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात कथन केले. तथापि अपिलार्थी यांनी पोस्टाने माहिती मागितली होती. तथापि प्रत्यक्ष दिली. तसेच त्यांना दि. ०८.०२.२०१० रोजीच्या पत्रावर दि. २२.०२.२०१० रोजी दिलेली पोच स्वाक्षरी त्यांची नाही, असे युक्तिवादात कथन केले.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांना प्रत्यक्षात व्यक्तिशः माहिती दिलेली नाही व अपिलार्थी यांनी दिलेली पोचस्वाक्षरी त्यांची नाही, असे त्यांच्या युक्तिवादाद्वारे अपिलार्थी यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले आहे. त्यांच्या या युक्तिवादाची सत्यता पडताळणी करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता या बाबीची संचालक,लेखा कोषागारे, मुंबई यांनी यथोचित चौकशी करावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा एक संच अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्याची व्यवस्था करावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय, बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीचा एक संच अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावा.

२) संचालक,लेखा कोषागारे, मुंबई यांनी वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणी अपिलार्थीच्या पोचस्वाक्षरीबाबत आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत यथोचित चौकशी करुन पुढील कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल हफिज सिद्दीकी,रा. अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य लेखा परिक्षक (क),स्थानिक निधी लेखा कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, लेखा व कोषागारे, शासकीय कुटीर क्र.१५ व १६, प्लॉट नं. १७६,फ्री प्रेस, जनरल मार्ग, मुंबई-२१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हनुमान बाबासाहेब गोंजारे, : अपिलार्थी
रा. तळेवाडी, ता.गेवराई, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६०६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड - श्री. अे. एल.रुमणे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०१.२००६ ते ३०.११.२००९ या कालावधीची रोकड वही (कॅश बुक) संदर्भात माहिती मागितली आहे. कार्यालयात दोन प्रकारचे कॅशबुक ठेवण्यात येतात. यामुळे नेमक्या कोणत्या कॅशबुकची माहिती अपेक्षित आहे, याचा बोध होत नाही. तसेच कॅशबुकची मागणी चार वर्षाची आहे. त्याच्या प्रती काढण्याकरिता ₹२२०००/- खर्च येतो. अपिलार्थी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नाहीत. म्हणून दि. ३०.१२.२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस कार्यालयात उपस्थित राहून पाहणी करावी, असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय अंतीम केलेला आहे व अपिलार्थी यांनी कार्यालयातील अभिलेखांचे समक्ष येऊन पाहणी करावी व तदनंतर आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती देण्यात याव्या,असा निर्णय दिला आहे. अपिलार्थी यांनी यासही प्रतिसाद दिलेला नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती पाहता, सदर माहितीकरिता जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहितीची पाहणी देण्यात यावी, हा घेतलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो. अपिलार्थीस माहितीच्या पाहणीची संधी देण्यात आलेली होती. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही, असे दिसून येत आहे. या सर्व बाबी पाहता प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हनुमान बाबासाहेब गोंजारे,रा. तळेवाडी, ता.गेवराई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नारायण ग्यानबा बापमारे, : अपिलार्थी
रा. मंगरुळ नं.१,
ता. माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (म.),
तहसील कार्यालय, माजलगाव, जि.बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव,
जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय, माजलगाव, जि.बीड - श्री. एस.सी.पाचपुते | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५.०३.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव, जि.बीड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव, जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१९.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण ग्यानबा बापमारे,मु.पो.मंगरुळ नं.१, ता.माजलगाव, जि.बीड

२.	जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.),तहसील कार्यालय, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बी.बी.सिरसाट,<br>रा. बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी,<br>सजा पिंगळे तरफ, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बी.बी.सिरसाट | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी,सजा बीड पिंगळे - श्री. शेळके आर.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, बीड - प्रभोदय मुळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवादावरुन अपिलार्थी यांना माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले. तथापि अपिलार्थी यांना माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये प्रश्नार्थक माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात निर्णय देण्याचे टाळले आहे, असे अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

यास्तव अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बीड यांनी सुनावणी घेऊन मुद्देनिहाय निर्णय घेणे आवश्यक राहील, या निकर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बीड यांनी अपिलार्थीच्या दि.३०.१०.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. बी.बी.शिरसाट, गजानन नगर, नाळवंडी रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा बीड पिंगळे, ता.जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अजित एम.देशमुख, | : | अपिलार्थी |
| रा.बीड | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपनिबंधक, यशवंतराव चव्हाण<br>विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे-७ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>निबंधक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे-७ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपनिबंधक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे-७ - श्री. योगेश भोसले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - निबंधक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,पुणे-७ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ३०.०१.२०१० रोजीच्या माहिती अर्जामध्ये यशदा संदर्भात एकूण १९ मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. सदरची माहिती संकलीत करण्याकरिता काही कालावधी लागणे आवश्यक होते. तदनंतर माहिती संकलीत करुन प्रतिपृष्ठ ₹२/- प्रमाणे ६२३ पृष्ठांकरिता ₹१२४६/-व पोस्टेजचा खर्च ₹२४८/- असे एकूण रक्कम ₹१४९४/- भरण्याबाबत अपिलार्थीस दि. २२.०२.२०१० रोजी कळविले आहे. अपिलार्थीचा अर्ज दि. ३०.०१.२०१० रोजीचा आहे. त्यानुसार अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या दि. १२.०४.२०१० रोजीच्या द्वितीय अपिलामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.०२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे शुल्काचा भरणा करावा, असे कळविलेले आहे, हे मान्य केले आहे.अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती एकूण १९ मुद्यांची आहे. जी माहिती उपलब्ध आहे, त्याकरिता सुमारे ६२३ पृष्ठे होतात, असे कळविले आहे. यावर अपिलार्थी यांनी त्यांना उपलब्ध होणाऱ्या माहितीकरिता शुल्काचा भरणा करुन माहिती हस्तगत करणे अभिप्रेत आहे. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत, त्यामुळे त्यांनी माहिती सशुल्क घ्यावी व अशा पध्दतीने अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती सशुल्क घेऊन माहिती अधिकार अधिनियम सकारात्मक दृष्टीने राबविणे योग्य राहील.

या सर्व बाबी पाहता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीकरिता शुल्काचा भरणा करुन माहिती घ्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यास तदनंतर पुढील तीस दिवसांचे आत अपिलार्थीस माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अजित एम.देशमुख,द्वारा गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड,बीड-४३१ १२२

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, यशवंतराव चव्हाण,विकास प्रशासन प्रबोधिनी,राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे-७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निबंधक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे-७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आसाराम ग्यानबा कांदे, : अपिलार्थी
रा. चोपनवाडी. पो.दिंद्रुड,
ता. माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,माजलगाव,
जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय,माजलगाव,
ता.माजलगाव, जि.बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६१० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,माजलगाव,जि.बीड - श्री. पाचपुते एस.सी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -तहसीलदार, माजलगाव,जि.बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७.०४.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव, जि.बीड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव,जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१७.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आसाराम ग्यानबा कांदे,रा. चोपनवाडी. पो.दिंद्रुड, ता. माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,माजलगाव, ता.माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,माजलगाव, ता. माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. तुषार अशोकराव फड,<br>रा. धर्मापुरी, ता.परळी वै.,जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,परळी वै.,जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,<br>परळी वै.जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषी अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,परळी वै.,जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,परळी वै.,जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व  उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून  प्रत्येक  सार्वजनिक  प्राधिकरणामध्ये  जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील  कलम  १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परळी वै.,जि.बीड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परळी वै.,जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि.०३.०३.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तुषार अशोकराव फड, मु. पो. धर्मापुरी, ता. परळी वै.,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,परळी वै.,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,परळी

वै.जि.बीड  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.          निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रामनाथ गणपतराव खोड,रा.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| अधीक्षक, | | |
| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बीड | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बीड | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामनाथ गणपतराव खोड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बीड - श्री. जी.जी.सुर्यवंशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बीड- श्रीमती उषा धनाजी चव्हाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांनी अपिलार्थीच्या दि.२३.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामनाथ गणपतराव खोड, शनिमंदीर गल्ली, जुना मोंढा रोड,बीड

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गाढे लक्ष्मण तुळशीराम,रा.बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती कार्यालय,
माजलगाव, जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय,माजलगाव,
जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती कार्यालय,माजलगाव, जि.बीड - श्रीमती तृप्ती विक्रम अंधारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालय,माजलगाव, जि.बीड - श्री. ठमके विजय के. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, त्यांनी त्यांच्या दि. १५.०१.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये माहितीचा तपशीलाचा तक्ता देऊन त्यामध्ये २३ बाबींच्या उपक्रमांचे तपशील देऊन सर्व शिक्षा अभियान राबविण्यासाठी करण्यात आलेल्या खर्चाचा तपशील विविध मुद्यांद्वारे मागितला आहे. या माहितीमध्ये - सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत विविध उपक्रमासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वरिष्ठ कार्यालयाकडून आलेल्या निधी संदर्भातील धनादेश क्रमांक व पावत्या तसेच शिल्लक रकमांसंदर्भात केलेले आर्थिक समायोजन तसेच शाळास्तरीय अपंग विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून स्वच्छतागृहासाठी आलेल्या निधीच्या खर्चाबाबतचा तपशील इ. - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे काही कालावधी लागला. आज रोजी अपिलार्थीस माहिती द्यावयास उपलब्ध आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना माहिती मिळाली नाही, असे नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज विचारात घेता त्यामध्ये मागितलेल्या माहितीची व्याप्ती व्यापक स्वरुपाची दिसून येत आहे. सदरची माहिती तीन वर्षांच्या कालावधीची आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कायद्यामागील भूमिका व उद्दीष्ट कसे सफल होईल, असा प्रश्नही उपस्थित होतो. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी माहिती तयार केली आहे. या माहितीची पाहणी करुन त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०३-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण तुळशीराम गाढे, रा. पालवण रोड, बाळराजे किराणा दुकानाचे पाठीमागे, बीड, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती कार्यालय,माजलगाव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहमद वहाब मोहमद युनुस, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी,
नगर परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहमद वहाब मोहमद युनुस | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासकीय अधिकारी, नगर परिषद, बीड - श्री. पी.ए.पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना दोन टप्प्यामध्ये मिळाली आहे, त्यामुळे त्यांचे द्वितीय अपील मागे घेण्याची परवानगी देण्यात यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहमद वहाब मोहमद युनुस,कारंजा रोड, खंडक, बीड-४३११२२

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, नगर परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख इरफान शेख नबी,<br>सय्यदनगर,रा.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी,बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड | : | अनुपस्थित |
| | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एल.एन.धस,<br>जिल्हा पुरवठा तपासणी अधिकारी,बीड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. तथापि त्यांना माहिती अपूर्ण, अर्धवट मिळाली आहे, असे मोघम नमूद केल्याचे दिसून येत आहे. नेमके नमूद केलेले नाही. यासाठी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांचे आत निश्चितपणे कोणती कागदपत्रे मिळाली नाहीत, याबाबत कळवावे, व पुढील पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा मूळ माहितीचा अर्ज विचारात घेऊन मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी, या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्याची कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख इरफान शेख नबी सय्यद,सय्यदनगर, पांगरी रोड समीर बिल्डींगच्या पाठीमागे, अंगीरा फर्निचरसमोर, बीड- ४३१ १२२

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश साहेबराव लांडगे,रा. माजलगाव, जि.बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि कार्यालय विभाग,
माजलगाव, जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, माजलगाव,जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय अधिकारी,माजलगाव, जि.बीड - श्री. मुंडे रत्नाकर आश्रुबा | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, माजलगाव,जि.बीड - श्री. वसंत गणपतराव राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी अपिलार्थीच्या यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित

केल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माजलगाव,जि.बीड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माजलगाव,जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१६.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश साहेबराव लांडगे,पंचशिलनगर (मंजरथरोड), माजलगाव,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हनुमान बाबासाहेब गोंजारे, : अपिलार्थी
रा. तळेवाडी, ता.गेवराई, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड - श्री. अे. एल.रुमणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०१.२००६ ते ३०.११.२००९ या कालावधीची रोकड वही (कॅश बुक) संदर्भात माहिती मागितली आहे. कार्यालयात दोन प्रकारचे कॅशबुक ठेवण्यात येतात. यामुळे नेमक्या कोणत्या कॅशबुकची माहिती अपेक्षित आहे, याचा बोध होत नाही. तसेच कॅशबुकची मागणी चार वर्षाची आहे. त्याच्या प्रती काढण्याकरिता ₹२२०००/- खर्च येतो. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत. म्हणून दि. ३०.१२.२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस कार्यालयात उपस्थित राहून पाहणी करावी, असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय अंतीम केलेला आहे व अपिलार्थी यांनी कार्यालयातील अभिलेखांचे समक्ष येऊन पाहणी करावी व तदनंतर आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती देण्यात याव्या,असा निर्णय दिला आहे. अपिलार्थी यांनी यासही प्रतिसाद दिलेला नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती पाहता, सदर माहितीकरिता जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहितीची पाहणी देण्यात यावी, हा घेतलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो. अपिलार्थीस माहितीच्या पाहणीची संधी देण्यात आलेली होती. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही, असे दिसून येत आहे. या सर्व बाबी पाहता प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हनुमान बाबासाहेब गोंजारे,रा. तळेवाडी, ता.गेवराई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. जनाबाई संजय व्यवहारे (काळे), : अपिलार्थी
रा. अणदूर, ह. मु. व्दारा किरण कुंज, हत्तेनगर, रोड क्रमांक २, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अणदूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे प्रतिनिधी - श्री. रामकुमार पंडित रायवाडीकर, रा. लातूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अणदूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-०३-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १५-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०८-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २६-०८-२०११ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यानंतर दिनांक १५-०२-२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व त्यांचे पती आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या विनंतीवरुन प्रकरणात पुढील तारीख देण्यात येऊन त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०५-०६-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. जनाबाई संजय व्यवहारे (काळे), व्दारा किरण कुंज, हत्तेनगर, रोड क्रमांक २, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अणदूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भानप नवनीत सुमंतराव, : अपिलार्थी
विभागीय वाहतुक अधिकारी, व्दारा, विभागीय कार्यालय
राज्य परिवहन, अंबाजोगाई रोड, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन, मध्यवर्ती
कार्यालय, मुंबई - ०८

जन अपिलीय अधिकारी तथा :
महाव्यवस्थापक, (क. व. औ. सं.), राज्य परिवहन,
मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, मुंबई - ०८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१११९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भानप नवनीत सुमंतराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई - ०८ | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>महाव्यवस्थापक, (क. व. औ. सं.), राज्य परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, मुंबई - ०८ | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७-०९-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २५-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६-१२-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-१२-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २४-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक १५-०२-२०१२ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सदरची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीबाबत उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, राज्य परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई श्री. दीपक कपूर यांना चौकशी करुन आयोगास अहवाल सादर करावा लागेल.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालील माहिती मागितली आहे.

१. दिनांक ३०-११-२००९ रोजी दिलेल्या वार्षिक गोपनीय अहवालाबाबतच्या निवेदनावर झालेल्या कार्यवाहीच्या सत्यप्रती.

२. दिनांक २४-१२-२००९ रोजी दिलेल्या निवेदनावर झालेल्या कार्यवाहीच्या सत्यप्रती.

३. दिनांक २५-१२-२००९ रोजी दिलेल्या निवेदनावर झालेल्या कार्यवाहीच्या सत्यप्रती.

४. दिनांक १३-०८-२०१० रोजी दिलेल्या निवेदनावर झालेल्या कार्यवाहीच्या सत्यप्रती.

५. दिनांक २१-०४-२००७ रोजी सादर केलेल्या विनंती बदली अर्जावरच्या कार्यवाहीच्या प्रती.

६. दिनांक ०२-०५-२००७ रोजी सादर केलेल्या विनंती बदली अर्जावरच्या कार्यवाहीच्या प्रती.

७. माझे सन २००९-१० च्या गोपनीय अहवालाच्या शे-याची प्रत.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये दिलेल्या माहितीच्या व्याख्येत सदरची माहिती येते त्यामुळे ती अपिलार्थीस देय होत आहे त्याच्या सत्यप्रती देणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय योग्य नाही असे आयोगाचे मत आहे. याकरिता अपिलार्थी यांनी उपरोक्त नमूद केलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीच्या प्रती, म्हणजे या निवेदनावर कार्यालयात निर्माण झालेल्या टिपणीच्या तसेच पत्रव्यवहाराच्या प्रती देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल. मागील दोन सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते याची गंभीर दखल आयोग घेत आहे. आज रोजीच्या सुनावणीस संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित राहतील ही बाब व्यक्तिशः पहावी असे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, राज्य परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई सेंट्रल यांना दिनांक २९-०२-२०१२

च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दोघेही अनुपस्थित आहेत. या सर्व बाबींची आयोगाने नोंद घेतली आहे. त्याकरिता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती मिळण्याच्या दृष्टीकोनातून आयोगास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) व 19 (7) नुसार दिलेल्या अधिकारानुसार ही जबाबदारी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, राज्य परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई सेंट्रल श्री. दीपक कपूर यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. त्यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याची व्यवस्था करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, राज्य परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई सेंट्रल यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, राज्य परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई सेंट्रल यांनी राज्य माहिती आयोगापुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीबाबतचा त्यांचा खुलासा प्राप्त करुन घेऊन आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भानप नवनीत सुमंतराव, विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, सिंधुदुर्ग विभाग, कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई - ०८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक, (क. व. औ. सं.), राज्य परिवहन, मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, मुंबई - ०८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, राज्य परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई सेंट्रल यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीराम कन्हैयालाल भंडारी, : अपिलार्थी
जगमित्र नागा को-ऑप. हौऊसिंग सोसायटी, परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५१६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीराम कन्हैयालाल भंडारी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड - श्री. एस. एम. मुंढे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>जिल्हा बीड - श्री. झाडके एस. ए. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १७-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २२-०१-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १७-०२-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले होते की, त्यांनी दिनांक १६-०९-२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये सोसायटीच्या जमिनीबाबत माहिती मागितली आहे. त्या जमिनीवर अतिक्रमण झाले असल्याने त्यांना या माहितीची आवश्यकता आहे. त्यांना ही माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच त्यांच्या दिनांक १७-११-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे की, आपला माहितीचा अर्ज कार्यालयात प्राप्त झालेला नाही, प्रथम अपिलाचे अवलोकन केले असता अर्जातील मजुकराचा बोध होत नाही म्हणून अर्ज निकाली काढण्यात येत आहे व आपणास जी माहिती हवी आहे त्याबाबत दुसरा अर्ज देऊन नियमाप्रमाणे माहिती हस्तगत करावी . ही बाब आयोगास योग्य वाटली नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक होते.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०२-२०१२ रोजीच्या पत्रान्वये निवडणुकीच्या कामामुळे सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची आयोगास विनंती केली होती. त्यांची विनंती मान्य करण्यात आली होती. या सर्व प्रकरणात सद्यस्थिती अवगत करण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) श्री. बी. पी. कुलकर्णी व तहसीलदार श्री. शरद झाडके यांनी व्यक्तिशः उपस्थित राहावे याकरिता प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी नेमकी कोणती माहिती मागितली त्याचा बोध होत नाही. त्यांना पाहणी देण्यात आली होती तथापि त्यांनी अशी पाहणी केलेली नाही. आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात स्थगिती (stay) आहे ती उठविण्यात यावी अशी त्यांची अपेक्षा आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये माहितीच्या व्याख्येत जी माहिती उपलब्ध आहे ती देय होते माहितीचे संस्करण करुन देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही प्रशासकीय बाब आहे याकरिता त्यांना रितसर विभागाकडे पाठपुरावा करावा लागेल व ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मान्य केली आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीराम कन्हैयालाल भंडारी, जगमित्र नागा को-ऑप. हौऊसिंग सोसायटी, परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. दत्तप्रसाद पांडुरंगजी रादंड,<br>गुरुवार पेठ, बालाजी मंदिरासमोर, अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : अपिलार्थी |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,बीड | : |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६१७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड - स्वाती रामराव भोर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १९-०३-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना विहित मुदतीत प्रतिसाद देऊन उपलब्ध असलेल्या माहितीबाबत दिनांक ३०-०३-२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांना दिनांक ०१-०४-२०१० रोजी भ्रमणध्वनीवरुन कल्पना दिल्यावर अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०४-२०१० रोजी माहिती हस्तगत केली आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असे कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती चुकीची दिली आहे असे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. त्यावर दिनांक २५-०५-२०१० रोजी जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, बीड यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, "अपिलार्थी यांनी मागितलेल्या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबाजोगाई यांनी या कार्यालयास पुरविली त्याची प्रत आपणास पुरविण्यात आल्याने आपली काही तक्रार राहिली नाही." प्रथम अपील सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते.

अपिलार्थी अनुपस्थित अहेत. त्यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाली आहे असे दिसून येत आहे. तथापि त्यांना चुकीची, अपुरी व दिशाभूल करणारी माहिती मिळाली आहे असे त्यांनी मोघमपणे नमूद केले आहे नेमके नमूद केलेले नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तप्रसाद पांडुरंगजी रादंड, गुरुवार पेठ, बालाजी मंदिरासमोर, अंबाजोगाई, तालुका

अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सचिन अर्जुनराव मुळूक, : अपिलार्थी
भारतीय विद्यार्थी सेना, जिल्हा प्रमुख, विद्यानगर पूर्व,
सह्याद्री हॉटेल मागे, बार्शी रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक कामगार अधिकारी, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक कामगार आयुक्त, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सरकारी कामगार अधिकारी, बीड<br>- श्री. युवराज सर्जेराव पडीयान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक कामगार आयुक्त, लातूर - श्री. एन. एन. इटकरी | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - श्री. बी. एन. जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०६-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये बीड शहरात चालणा-या खाजगी कोचिंग क्लासेसबाबतची माहिती मागितली आहे. माहिती संकलीत करुन अपिलार्थीस विहित मुदतीत दिनांक ०५-०३-०१० ला पाठविण्यात आलेली आहे व अपिलार्थीची पोच त्यांच्या दप्तर दाखल आहे. अपिलार्थी यांनी त्यांना मुद्दा क्रमांक २ ची माहिती मिळाली नाही म्हणून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतली व अपिलार्थीस संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला. त्यानंतर मुद्दा क्रमांक २ ची माहिती निरंक असल्याबाबत दिनांक २४-०४-२०१० रोजी अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे. या सर्व बाबी कागदपत्रावरुन दिसून येत आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या दिनांक ०२-०६-२०१० च्या व्दितीय अपिलाव्दारे मागितलेली खाजगी कोचिंग क्लासेस बाबत अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे, असे नमूद केले आहे. तथापि सदरची माहिती निरंक आहे असे दिसून येत आहे. यास्तव आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सचिन अर्जुनराव मुळूक, भारतीय विद्यार्थी सेना, जिल्हा प्रमुख, विद्यानगर पूर्व, सह्याद्री हॉटेल मागे, बार्शी रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त, लातूर यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उध्दव बाबासाहेब मिसाळ, : अपिलार्थी
रा. व्दारा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय,
जालना रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शिरुर (कासार),
तालुका शिरुर (कासार), जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक भूमि अभिलेख, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६१९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक भूमि अभिलेख, शिरुर (कासार),<br>तालुका शिरुर (कासार), जिल्हा बीड<br>- श्री. राजेंद्र देविदास कपोते | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. डी. बी. पोतदार, प्रमुख लिपीक | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०-०३-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २५-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांचे व्दितीय अपील ॲड अजित एम. देशमुख, बीड यांचे मार्फत सादर केले आहे. तथापि ते दोघेही सुनावणीसाठी उपस्थित राहिले नाहीत.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २०-०४-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिश: उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उध्दव बाबासाहेब मिसाळ, रा. व्दारा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय, जालना रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक भूमि अभिलेख, शिरुर (कासार), तालुका शिरुर (कासार), जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, : अपिलार्थी
व्दारा श्री. माणिक पांडे निवास, भटगल्ली, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी, :
शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६२० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कनिष्ठ लिपीक, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड<br>- श्री. लक्ष्मण पंडितराव कुलकर्णी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २५-०३-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाली नाही असे नमूद केले आहे. तसेच आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २५-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, व्दारा श्री. माणिक पांडे निवास, भटगल्ली, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. दिलीप कातांराव भाले,<br>मनोज मस्के यांचा वाडा, केशवराज मंदिर, मोटे गल्ली,<br>गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड - श्री. र. ब. करपे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०२-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये पैठण उजव्या कालव्यावरील ० ते १३२ मधील पदमिनी कन्स्ट्रक्शन यांच्या कामाच्या अंदाजपत्रकाची छायांकीत प्रत व त्याचप्रमाणे या कामासाठी आतापर्यंत किती रक्कम अदा करण्यात आली ही माहिती मागितली आहे. मुद्दा क्रमांक २ ची माहिती अपिलार्थीस देण्यात येऊन उर्वरीत माहितीकरिता रुपये ८०० पेक्षा जास्त खर्च येणार असल्याने ती रक्कम भरावी अथवा कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयात येऊन माहितीची पाहणी करावी असे दिनांक ०५-१२-२००९ रोजी विहित मुदतीत कळविले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक २२-०१-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे कार्यालयात उपस्थित राहून माहितीची पाहणी करावी. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला आढळून येत नाही.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात मागणी केली आहे त्या स्वरुपात देण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील साधनसामग्री व मनुष्यबळ जास्त मोठ्या प्रमाणात वळवावे लागत असल्यास कलम ७ (९) नुसार त्याची पहाणी देणे अभिप्रेत आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (त्र) मध्ये माहितीच्या अधिकाराच्या केलेल्या व्याख्येनुसार माहितीची पाहणी देणे हा प्रथम पर्याय आहे. अशी पाहणी दिली म्हणजे माहिती दिली आहे असे होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिलेला आहे. तथापि अपिलार्थीस पुन्हा एकदा माहिती पाहण्याची संधी देण्यात यावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. माहितीचा अर्ज ज्या व्यक्तिने केला आहे त्यालाच पाहणी अनुज्ञेय राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील उर्वरीत अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०३-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप कातांराव भाले, मनोज मस्के यांचा वाडा, केशवराज मंदिर, मोटे गल्ली, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रकाश अंबादासराव गुंड,<br>टेलर गल्ली, केज, तालुका केज, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>केज, तालुका केज, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>केज, तालुका केज, जिल्हा बीड - श्री. पी. एम. सोरजी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०६-०५-२०१० रोजी दिलेली आहे. ही बाब अपिलार्थी यांनी मान्य केलेली आहे तथापि अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती मिळाली आहे म्हणून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले आहे. यावर दिनांक २२-०६-२०१० रोजी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी उर्वरीत माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे व त्याची पोच अपिलार्थी यांनी दिलेली आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश अंबादासराव गुंड, टेलर गल्ली, केज, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळासाहेब नारायण तौर, : अपिलार्थी
मोटे गल्ली, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. एम. बी. शिंदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०५-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाअंतर्गत जानेवारी २००८ ते डिसेंबर २००९ पर्यंत कोणकोणती कामे झाली, त्यावर झालेला खर्च, चालू वर्षाचा प्रस्ताव, आराखडा इत्यादीबाबतची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या माहिती अर्जावरुन त्यांना हव्या असलेल्या माहितीचा बोध होत नसल्याने अपिलार्थीस कार्यालयात उपस्थित राहून माहिती पाहू शकाल असे दिनांक २४-१२-२००९ च्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत कळविण्यात आले. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १०-०३-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, मागणी केलेली देय माहिती उपलब्ध असलेल्या स्वरुपात पुरविण्यात यावी. तथापि अपिलार्थीने त्यांना नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे याबाबत प्रतिसाद दिलेला नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०३-२०१२**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळासाहेब नारायण तौर, मोटे गल्ली, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. कैलास नारायण राऊत,<br>मु. पो. पाली, तालुका जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कैलास नारायण राऊत | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, बीड<br>- श्री. के. एस. फारुकी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड - श्री. र. ब. करपे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०४-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी यांचे वकील अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकूण दहा वर्षाची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. या माहितीकरिता रुपये १८३५२ /- इतक्या शुल्काचा भरणा करावा असे अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कळविण्यात आले आहे. तसेच जी माहिती उपलब्ध आहे अशा माहितीची पृष्ठ संख्याही कळविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे रुपये १८३५२ /- चा भरणा केल्यानंतर माहिती त्वरित द्यावी असा निर्णय दिनांक १७-०४-२०१० रोजी दिला आहे. सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांनी दिनांक १७-०४-२०१० रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. अपिलार्थीने रुपये १८३५२ /- इतक्या शुल्काचा भरणा केल्यास अपिलार्थीस माहिती पाठविण्याची व्यवस्था करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २१-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कैलास नारायण राऊत, मु. पो. पाली, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुर्यभान श्रीरंग गोरे, : अपिलार्थी
मु. पो. पाली, तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६२५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुर्यभान श्रीरंग गोरे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, बीड - श्री. के. एस. फारुकी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड - श्री. र. ब. करपे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सन २००० ते दिनांक २५-०१-२०१० पर्यंतच्या कालावधीची विविध अशा सोळा मुद्दयावर उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, बीड अंतर्गत होणा-या कामा-बाबतची विस्तृत अशी माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीकरिता रुपये ४३७६८ इतक्या शुल्काचा भरणा करावा असेही विहित मुदतीत कळविल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यांना सदर पत्र प्राप्त झाले नाही असा युक्तिवाद केला आहे. अपिलार्थी दारिद्ररेषेखालील नाहीत. तसेच त्यांनी शुल्क भरण्यास प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली आहे आणि त्यानुसार अपिलार्थीचे अपील अमान्य करण्यात आलेले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेली माहितीची व्याप्ती स्वेच्छेने कमी करुन त्यांच्या मूळ माहिती अर्जातील १६ मुद्दयांपैकी २-३ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागावी व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास एक दिवस निश्चित करुन माहितीची पाहणी द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या छायांकीत प्रती त्यांना सशुल्क उपलब्ध करुन द्याव्यात या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, बीड यांनी अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे सशुल्क छायांकीत करुन देण्याची व्यवस्था

करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यभान श्रीरंग गोरे, मु. पो. पाली, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नवनाथ मारोती राऊत, : अपिलार्थी
रा. चिंचोली माळी, पो. अंतरवन पिंप्री, तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६२६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नवनाथ मारोती राऊत | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी, नगर परिषद, बीड<br>- श्री. पाटील पी. ए. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी, त्यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना मिळाली असल्याने त्यांचे विचाराधीन व्दितीय अपील निकाली काढण्याची आयोगास विनंती केली आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नवनाथ मारोती राऊत, रा. चिंचोली माळी, पो. अंतरवन पिंप्री, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, नगर परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ओमप्रकाश मालपानी, : अपिलार्थी
पूर्णावादी बँकेच्या पाठीमागे, अयोध्यानगर, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६२७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ओमप्रकाश मालपानी, | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड<br>- श्री. बोरसे देविदास एच. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०६-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही. याची आयोग गंभीर दखल घेत आहे. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) व 19 (7) मधील आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार आयोग मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ओमप्रकाश मालपानी, पुर्णावादी बँकेच्या पाठीमागे, अयोध्यानगर, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख सादेख शेख वाहेद,<br>रा. फुलेनगर, केज, तालुका केज, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, गट शिक्षण कार्यालय, पंचायत समिती, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १९-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख सादेख शेख वाहेद, रा. फुलेनगर, केज, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परभणी यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. झोडगे शिवाजी गंगाराम,<br>रा. हिवरगव्हाण, पो. उपळी, व्दारा, मु. पो. वडवणी, कोर्टासमोर, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हिवरगव्हाण, तालुका वडवणी, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हिवरगव्हाण, तालुका वडवणी, जिल्हा बीड<br>- श्री. पूणे एस. एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. राऊत बी. डी., विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वडवणी, जिल्हा बीड | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १७-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी नुकताच कार्यभार घेतला आहे. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती यापूर्वी दिली किंवा कसे हे कागदपत्रावरुन आढळून येत नाही. तथापि अपिलार्थीस नुकतीच माहिती देण्यात आली आहे. ही बाब कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. झोडगे शिवाजी गंगाराम, रा. हिवरगव्हाण, पो. उपळी, व्दारा, मु. पो. वडवणी, कोर्टासमोर, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हिवरगव्हाण, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,

वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊराव रघुनाथ खांडे,<br>रा. म्हाळसापूर, पो. म्हाळसजवळा, तालुका जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,<br>जिल्हा परिषद, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भाऊराव रघुनाथ खांडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग, बीड<br>- श्री. डी. आर. वाघलगावे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. जाधव यु. ए., विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी कार्यभार घेण्यापूर्वीचा अपिलार्थीचा माहितीचा अर्ज आहे. आणि पूर्वीच्या अधिका-याने माहिती दिली आहे व त्याबाबत अपिलार्थीने पोच दिलेली आहे. आज रोजी या माहितीचा एक संच जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे तो आयोगाच्या सुचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आला आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २१-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भाऊराव रघुनाथ खांडे, रा. म्हाळसापूर, पो. म्हाळसजवळा, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जनार्दन गोविंदराव राऊत, : अपिलार्थी
गुरुकृपा निवास, माधवबाग, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६३१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड<br>- श्री. एस. एम. मुंडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड - श्री. झाडके एस. ए. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८-०२-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०४-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ११-०४-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जनार्दन गोविंदराव राऊत, गुरुकृपा निवास, माधवबाग, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण रामप्रसाद वर्मा, : अपिलार्थी
'सतीधाम', सदर बाजार, अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६३२

२ सुनावणीची तारीख दि. २१-०३-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. अरुण रामप्रसाद वर्मा : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,
अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड
- श्रीमती एस. एल. जोगदंड

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १०-०३-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. १६-०४-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

१. स्वस्त धान्य दुकान क्रमांक ५ च्या संदर्भात दिनांक ३०-०६-२००७ रोजी पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाची प्रत.

२. दिनांक २१-०६-२००७ च्या संदर्भात मोर्च्याचा तपशील.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, सदरची माहिती अपिलार्थीस यापूर्वीच्या एका माहिती अर्जाच्या संदर्भात दिनांक १६-०६-२००८ रोजी देण्यात आली आहे. ही माहिती अपिलार्थीस मिळाल्याची पोच अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयास दिली आहे. आज रोजी उपलब्ध असलेली माहिती आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आली आहे तसेच अपिलार्थीने ती स्वीकारली आहे. २१ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांनी भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या माहिती अर्जावर विहित मुदतीत माहिती देण्यासाठी दक्ष राहावे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रामप्रसाद वर्मा, 'सतीधाम', सदर बाजार, अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रणजीत नामदेव चव्हाण, : अपिलार्थी
मु. पो. पिंपरखेड, पो. हिवरा, तालुका आष्टी, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, आष्टी,
तालुका आष्टी, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६३३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, आष्टी,<br>तालुका आष्टी, जिल्हा बीड - श्री. प्रभाकर उत्तमराव खिल्लारे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी,<br>जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०२-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रणजीत नामदेव चव्हाण, मु. पो. पिंपरखेड, पो. हिवरा, तालुका आष्टी, जिल्हा

बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुटे उध्दव विठ्ठलराव, : अपिलार्थी

मु. वंजारवाडी, पो. राजुरी (नं.), तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

जिल्हा अधीक्षक कृषि कार्यालय, बीड

जन अपिलीय अधिकारी, :

जिल्हा अधीक्षक कृषि कार्यालय, बीड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६३४

२ सुनावणीची तारीख दि. २१-०३-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
कार्यालय, बीड - श्री. बी. एम. गायकवाड

३.३ जन माहिती अधिकारी तथा उपस्थित

तंत्र अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,
बीड - श्री. म. मअरोद्दीन

३.४ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, बीड

- श्री. आर. एस. भताने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये बीड जिल्ह्यातील जिल्हा पाणलोट क्षेत्र विकास योजना, त्रयस्थ श्री. गीते यांची माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्रत्येक महिन्याचा ए. टी. पी., यवतमाळ येथील कंपनीच्या पुरवठ्याबाबतची माहिती, विविध योजनांची भौतिक तपासणी-बाबतची माहिती, रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रमाबाबत माहितीच्या छायांकीत प्रती अशी विस्तृत माहिती मागितली आहे. अपिलार्थी माहिती व्यक्तिशः घेणार होते. अपिलार्थीस माहिती संकलीत करुन उपलब्ध झाली ती हस्तगत करण्यासाठी दिनांक १०-०३-२०१० च्या पत्रानुसार दिनांक १८-०३-२०१० रोजी घेऊन जावी असे कळविण्यात आले. अपिलार्थी यांनी दिनांक २१-०३-२०१० ला माहिती घेतली. अपिलार्थी यांनी मिळालेली माहिती अपूर्ण आहे असे मोघमपणे नमूद करुन दिनांक ०१-०४-२०१० रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २६-०४-२०१० च्या पत्रानुसार दिनांक ०३-०५-२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली. ती दिनांक ११-०५-२०१० रोजी घेण्यात आली. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला आहे की, दोन मुद्दे (मुद्दा क्रमांक ३ व ५) वगळता इतर मुद्दयाबाबत उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली व दिनांक ११-०५-२०१० रोजी उर्वरित माहितीच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य देण्यात आल्या. पहिल्या टप्प्यात १९ पानांची माहिती दिली आहे. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या दिनांक ०७-०६-२०१० च्या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी माहिती अपूर्ण देणे, विहित मुदतीत न देणे असे दुसरे अपील करण्याच्या प्रयोजनामध्ये नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात होती ती माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात आहे तथापि कोणती माहिती मागितली आहे ती पाहून तशी माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुटे उध्दव विठ्ठलराव, मु. वंजारवाडी, पो. राजुरी (नं.), तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. कचरुलाल बस्तीलाल जैन, | : | अपिलार्थी |
| | रा. शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, बीड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालय अधीक्षक, तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड - श्रीमती एस. डी. नवगीरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड - श्री. ए. एस. कदम | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड श्री. ए. एल. घोलकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०२-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १५-०३-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व तत्कालीन आणि सध्याचे जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकूण ९ मुद्दयांवर प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली आहे. तथापि या माहितीच्या प्रश्नाच्या संदर्भात जी कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध आहेत ती दिनांक ०१-०२-२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहेत. प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती, माहिती या व्याख्येत येत नसल्यामुळे देय होत नाही असे कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन या सर्व बाबींची नोंद घेऊन अपील अमान्य करण्याचा निर्णय दिनांक १५-०३-२०१० रोजी घेतला आहे. अपिलार्थी प्रथम अपील सुनावणीच्या वेळी उपस्थित होते. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) नुसार माहिती या व्याख्येत अशी माहिती येत नाही. जी माहिती उपलब्ध आहे ती देणे आवश्यक आहे. माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे त्या स्थितीत देय आहे. माहिती संस्करण करुन देण्याची तरतूद कायद्यामध्ये नाही. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही आयोगास योग्य वाटते. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावरुन आणि व्दितीय अपिलावरुन त्यांची त्यांच्या भूखंडाबाबत काही तक्रार आहे असे दिसून येत आहे. त्याकरिता त्यांना संबंधित प्रशासकीय विभागाकडे रितसर अर्ज करावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कचरुलाल बस्तीलाल जैन, रा. शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पंजाब राजाराम देशमुख, : अपिलार्थी
रोहण ड्रेसेस, राजाई एनक्लेव्ह, वामननगर, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
आस्थापना विभाग, आस्था शाखा-१, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी, :
आस्थापना विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२०९६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पंजाब राजाराम देशमुख | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून, आस्था-१, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड - श्री. देळमडे एम. एन. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (आस्था), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड - श्री. दासरे यु. एम. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०४-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०७-०५-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०८-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी राजाराम बाबाराव देशमुख यांच्याबाबत त्यांच्या माहिती अर्जान्वये माहिती मागितली आहे. राजाराम बाबाराव देशमुख हे किनवट येथे असताना मृत्यु पावले आहेत. हा कालावधी सन १९६४ चा आहे. त्यासंदर्भातील कागदपत्रे मागितली आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (आस्था), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १७-०६-२०११ रोजी निर्णय दिला आहे. त्या निर्णयामध्ये त्यांनी सदरची माहिती किनवट येथे असणे अपेक्षित आहे व तहसीलदार, किनवट यांनी माहिती द्यावी असा निर्णय दिला आहे. हा निर्णय योग्य आहे असे अपिलार्थी यांनी कथन केले. तथापि त्यांना प्रतिसाद मिळालेला नाही.

वरील बाबी विचारात घेता माहितीच्या अर्जाच्या संदर्भात अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती संकलीत करुन अपिलार्थीस देण्याकरिता राज्य माहिती आयोगास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) व १९ (७) नुसार दिलेल्या अधिकाराचा वापर करुन तहसीलदार, किनवट श्री. हरिदास कांबळे यांचेवर ही माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे. माहिती संकलीत करुन अपिलार्थीस देण्यात यावी. अपिलार्थी माहितीचा शोध घेण्याकरिता सहकार्य करण्यास तयार आहेत. याकरिता दोन कर्मचा-यांचा एक गट करण्यात यावा व या माहितीचा शोध घेण्यात यावा. या गटाने केलेल्या कार्यवाहीची दैनंदिनी ठेवण्यात यावी. या संचिकेचा शोध घेण्याकरिता अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे कळवून शोध घेण्यात यावा या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. ही कार्यवाही दोन महिन्याच्या आत करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

तहसीलदार किनवट, जिल्हा नांदेड श्री. हरिदास कांबळे यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच दोन महिन्याच्या आत कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०३-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंजाब राजाराम देशमुख, रोहण ड्रेसेस, राजाई एनक्लेव्ह, वामननगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, आस्था-१, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (आस्था), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भताने जगन्नाथ रामचंद्र, : अपिलार्थी
रा. रायवाडी, पो. महाळंगी, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, सज्जा, महाळंगी, तालुका चाकूर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, झरी (बु.), तालुका चाकूर, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भताने जगन्नाथ रामचंद्र | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सज्जा, महाळंगी, तालुका चाकूर, जिल्हा लातूर -श्री. भास्कर कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - श्री. वजीरे व्ही. एस. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, झरी (बु.), तालुका चाकूर, जिल्हा लातूर - श्री. कांबळे एस. जी. | : | उपस्थित |
| ३.५ | विशेष साक्ष - तहसीलदार, चाकूर, जिल्हा लातूर - श्री. विक्रम देशमुख | : | उपस्थित |
| ३.६ | विशेष साक्ष - उप विभागीय अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर - श्री. लतीफ पठाण | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २०-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ३०-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ०५-१०-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १४-१२-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १०-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये आयोगास अवगत केले होते की, त्यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थ व्यक्तीसंदर्भात असून सदर त्रयस्थ व्यक्ती एक निराधार महिला आहे. या त्रयस्थ व्यक्तीच्या जमिनीवर खोटा फेरफार झाला आहे अशी त्यांची धारणा आहे. याकरिता त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे मौजे रामवाडी येथील गट क्रमांक ३१ चा ७/१२, फेर क्रमांक ३५९ च्या प्रती व त्यासंदर्भातील इतर माहिती मागितली आहे. त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला आहे की, अपिलार्थीने माहितीच्या अधिकारातील अर्ज जन माहिती अधिकारी, तलाठी सजा महाळंगी कार्यालयात रितसर अर्ज करुन आवश्यक ती माहिती हस्तगत करुन घ्यावी.

प्रकरणात उप विभागीय अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर व तहसीलदार, चाकूर, जिल्हा लातूर यांच्या विशेष साक्षीसाठी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक १६-०२-२०१२ रोजी ठेवण्यात आली होती. दिनांक १६-०२-२०१२ रोजीच्या सुनावणीस अपिलार्थी व उप विभागीय अधिकारी, उदगीर यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, तहसीलदार, चाकूर व उप विभागीय अधिकारी, उदगीर निवडणुकीच्या कामामुळे अनुपस्थित होते. त्यामुळे त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी, उदगीर व तहसीलदार, चाकूर उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली सर्व कागदपत्रे त्यांना देण्यात आली आहेत. सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी त्यांना कागदपत्रे मिळाली आहेत ही बाब मान्य केली. यास्तव प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात झालेल्या विलंबा-बाबत उपविभागीय अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर यांनी चौकशी करावी व यानंतर यथोचित कारवाई योजावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**<br>
**राज्य माहिती आयुक्त,**<br>
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**<br>
**दिनांक २२-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव<br>
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भताने जगन्नाथ रामचंद्र, रा. रायवाडी, पो. महाळंगी, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सज्जा, महाळंगी, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, झरी (बु.), तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपविभागीय अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी (रोहिणेकर), : अपिलार्थी
श्रीकृष्णनगर, सम्राट चौक, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, चाकूर,
तालुका चाकूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर,
जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर - श्री. विक्रम सदाशिव देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. १०-१२-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १०-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक १६-०२-२०१२ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थी यांनी युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, मौ. रोहिणा, तालुका चाकूर येथील गट नंबर २४३ संदर्भात चुकीची नोंद असलेला ७/१२ चा उतारा मिळाला आहे. सन २००४ मध्ये वेगळी नोंद आहे व झालेला फेरफार कोणत्या कागदपत्रांच्या आधारे झालेला आहे त्या कागदपत्रांच्या प्रती मागत आहेत. त्यांना कागदपत्रे मिळालेली नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक वाटत असल्याने आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख दिनांक २२-०३-२०१२ अशी निश्चित करण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०६-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी (रोहिणेकर), श्रीकृष्णनगर, सम्राट चौक, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अमीन अहेमद पिता नूर अहेमद, : अपिलार्थी
सेवानिवृत्त कक्ष अधिकारी,
व्दारा, उमेर किराणा स्टोअर्स, घर क्रमांक ५९९, युसूफ कॉलनी, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्राचार्य, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अध्यापक महाविद्यालय, युसुफियाँ कॉलनी, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अध्यापक महाविद्यालय, युसुफियाँ कॉलनी, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-०९-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-१२-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२१-०६-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०२-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे बाजू ऐकून घेण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक १६-०२-२०१२ रोजी ठेवण्यात आली होती. दिनांक १६-०२-२०१२ रोजी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे बाजू ऐकून घेण्यासाठी त्यावेळी सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. प्रकरणात सुनावणीकरिता पुढील तारीख देण्याचा निर्णय आयोगातर्फे घेण्यात येत आहे याची नोंद प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांनी घ्यावी व पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित राहतील असे पहावे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०५-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २२-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अमीन अहेमद पिता नूर अहेमद, सेवानिवृत्त कक्ष अधिकारी, व्दारा, उमेर किराणा स्टोअर्स, घर क्रमांक ५९९, युसूफ कॉलनी, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अध्यापक महाविद्यालय, युसुफियाँ कॉलनी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बबन रावसाहेब मस्के,<br>मु. पो. आडस, तालुका केज, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभागीय पोलीस कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बबन रावसाहेब मस्के | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस अधीक्षक, उप विभागीय पोलीस अधिकारी, केज, तालुका केज, जिल्हा बीड<br>- श्री. अखिलेश कुमार सिंह | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीबाबत दिनांक २०-०२-२०१० रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, केज यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली आहे या निष्कर्षाप्रत येऊन दिनांक १५-०४-२०१० रोजी प्रथम अपील निकाली काढले आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे असे सुनावणीत त्यांनी मान्य केले आहे. तथापि मागितलेली माहिती त्यांना अपेक्षित अशी नाही. मागितलेल्या माहितीतील मजकूर त्यांना जसा हवा आहे तसा नाही असा युक्तिवाद केला. तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जी माहिती उपलब्ध आहे ती देणे अभिप्रेत आहे. माहिती संस्करण करुन देणे अभिप्रेत नाही. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बबन रावसाहेब मस्के, मु. पो. आडस, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस अधीक्षक, उप विभागीय पोलीस अधिकारी, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. दैवशाला बबन शिरोळे, : अपिलार्थी
मु. वटनवाडी, पो. कडा साखर कारखाना, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक निबंधक, सहकारी संस्था, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६३७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था, आष्टी, जिल्हा बीड<br>- श्री. ससाणे एस. पी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे व त्याबाबतची दिनांक ३०-०७-२०१० रोजी अपिलार्थीने पोच दिलेली आहे. अपिलार्थीचे व्दितीय अपील दिनांक २०-०७-२०१० रोजीचे आहे आणि त्यानंतर त्यांना माहिती मिळाली आहे असे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. दैवशाला बबन शिरोळे, मु. वटनवाडी, पो. कडा साखर कारखाना, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अभिमन्यू आश्रुबा मस्के, (प्रमुख कारागीर),<br>राज्य परिवहन विभागीय कार्यशाळा, बार्शी रोड, बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बस स्थानकाजवळ, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बस स्थानकाजवळ, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अभिमन्यू आश्रुबा मस्के | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बस स्थानकाजवळ, बीड<br>- श्री. बंडे विश्वनाथ व्यंकटराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बस स्थानकाजवळ, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. घुले बी. डब्ल्यू. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०४-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १५-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सेवाविषयक बाबीवर माहिती मागितली आहे. त्यातील तीन मुद्दे प्रश्नार्थक आहेत व दोन मुद्दे कोणती कार्यवाही करण्यात येईल अथवा केव्हा करण्यात येईल अशी भविष्यातील माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येमध्ये अशी माहिती येत नाही. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक ३०-०४-२०१० रोजी जी माहिती उपलब्ध आहे त्याबाबत कळविण्यात आलेले आहे. या सर्व बाबी विचारात घेता या टप्प्यावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अभिमन्यू आश्रुबा मस्के, (प्रमुख कारागीर), राज्य परिवहन विभागीय कार्यशाळा, बार्शी रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन विभागीय

कार्यालय, बस स्थानकाजवळ, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बस स्थानकाजवळ, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मदनराव नामदेवराव टेकाळे, | : | अपिलार्थी |
| | रा. चिंचपूर, तालुका आष्टी, जिल्हा बीड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | उप संचालक भूमि अभिलेख, तालुका जिल्हा औरंगाबाद | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | संचालक, भूमि अभिलेख, पुणे, तालुका जिल्हा पुणे | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मदनराव नामदेवराव टेकाळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | कार्यालय अधीक्षक, उप संचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद - श्री. सी. ए. ठाकूर | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | संचालक, भूमि अभिलेख, पुणे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी त्यांच्या दिनांक २९-०४-२०१० च्या माहिती अर्जान्वये, दिनांक १०-०८-२००९ रोजी दिलेल्या अर्जावर व दिनांक २१-०१-२०१० आणि २५-०३-२०१० रोजी उप संचालक, भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे सादर केलेल्या स्मरणपत्रावर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मागितली आहे. त्यांना ही माहिती मिळाली आहे तथापि त्यांच्या अर्जावर व स्मरणपत्रावर त्यांना अपेक्षित असलेली कार्यवाही झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दिनांक ०३-०५-२०१० रोजी त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाला. अपिलार्थी यांना दिनांक ०४-०५-२०१० रोजी उत्तर दिले आहे व त्यांच्या अर्जाबाबत सद्यस्थिती कळविली आहे. त्या माहितीत आजही बदल झालेला नाही. अपिलार्थीचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रलंबीत नाही. अपिलार्थी यांना अपेक्षित असलेली कार्यवाही ही प्रशासकीय बाब आहे याकरिता अपिलार्थी यांनी सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मदनराव नामदेवराव टेकाळे, रा. चिंचपूर, तालुका आष्टी, जिल्हा बीड.
२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उप संचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शशिकांत संभाजीराव ध्वजकरी, : अपिलार्थी

सह शिक्षक, महाराष्ट्र विद्यालय, बनसारोळा, तालुका केज, जिल्हा बीड

व्दारा, श्री. दिलीप संभाजीराव ध्जकरी, व श्रे लि, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६४० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय | : अनुपस्थित |

जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २२-०६-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २७-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०४-०६-२०१० फेरसादर दिनांक १२-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"माझे सर्व मूळ प्रमाणपत्र वरील पत्रासोबत आपलेकडे सादर केलेले आहेत. तरी माझे जात पडताळणी प्रमाणपत्र आद्याप मिळाले नाहीत. ते पाठविण्यास विनंती आहे किवा ते अद्याप कशासाठी प्रलंबीत आहे त्याची माहिती मुदतीत मिळणेस विनंती आहे."

यासंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिला नसल्याचे नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद् यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-११-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शशिकांत संभाजीराव ध्वजकरी, सह शिक्षक, महाराष्ट्र विद्यालय, बनसारोळा, तालुका केज, जिल्हा बीड, व्दारा, श्री. दिलीप संभाजीराव ध्जकरी, व श्रे लि, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद् यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद् यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुभाष बाबाराव शेटे,<br>व्दारा, गजानन भोजनालयाजवळ, शिवाजीनगर,<br>माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगांव,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>एस. आय., नगर परिषद, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. सावंत के. टी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगांव,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. पाटील पी. के. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे व याबाबतची पोच अपिलार्थीने दिलेली आहे.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती तथापि ते आज रोजी सुनावणीस अनुपस्थित आहेत. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभाष बाबाराव शेटे, व्दारा, गजानन भोजनालयाजवळ, शिवाजीनगर, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा स्वच्छता निरिक्षक, नगर परिषद, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. चाटेकर राजेश लिंबराज,<br>पोलीस मुख्यालयासमोर, नगर रोड, बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. चाटेकर राजेश लिंबराज | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. जाधव टी. वाय., सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी सन १९९६ ते ३१-०३-२००० पर्यंतची इतर मागासवर्गीय प्रवर्गातील नोंद झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांची चार मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरची माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे. त्यामध्ये त्यांचे नांव आहे. तथापि त्यांना दोन प्रतिक्षा नंबर कळविण्यात आले आहे त्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला आहे असे त्यांचे म्हणणे आहे. यावरुन अपिलार्थी यांना दिलेल्या माहितीमध्ये तफावत आहे असे दिसून येत आहे. याकरिता या प्रकरणात विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी संपूर्ण चौकशी करावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणी संपूर्ण चौकशी करावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चाटेकर राजेश लिंबराज, पोलीस मुख्यालयासमोर, नगर रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी-संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. फकिरचंद महादेव लुचारे, : अपिलार्थी
रा. कुक्कडगांव, पो. पिंपळनेर, तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कुक्कडगांव, तालुका जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६४३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी ॲडव्होकेट श्री. अे. व्ही. कुलकर्णीसह | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कुक्कडगांव, तालुका जिल्हा बीड<br>- मुने व्ही. जी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बीड<br>- श्री. जाधव यु. ए. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०४-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांचे वकिलासह, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मौजे कुक्कडगांव, तालुका जिल्हा बीड येथील त्रयस्थाचे घर क्रमांक ३५२ च्या ग्रामपंचायत स्थापन झाल्यापासून नमुना नंबर ८ च्या नकला मागितल्या आहेत. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी त्यांच्याकडे दप्तरातील उपलब्ध असलेल्या माहितीचा शोध घेऊन सन १९९१-९२ आणि २००१-०२ या कालावधीतील घर क्रमांक ३५२ च्या नकला अपिलार्थीस दिल्या आहेत. ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मान्य केली. तथापि त्यांना ग्रामपंचायत स्थापन झाल्यापासूनची माहिती आवश्यक आहे. परंतु माहितीचे अभिलेखे सध्याच्या ग्रामसेवकाकडे हस्तांतरीत झालेले नाहीत. त्यामुळे सध्या ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. आयोगास असेही दिसून आले आहे की, अपिलार्थी यांनी त्रयस्थाची माहिती मागितली आहे. याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (७) व ११ नुसार त्रयस्थ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक होते व त्यांची बाजू ऐकून घेतल्यानंतर माहिती देय होते किंवा कसे ही बाब पाहणे योग्य ठरले असते. सदरची बाब जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील सुनावणीच्या वेळी विचारात घेतली नाही असे दिसते. या सर्व बाबी विचारात घेता सदरचे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. फकिरचंद महादेव लुचारे, रा. कुक्कडगांव, पो. पिंपळनेर, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कुक्कडगांव, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. निलकंठ पंडितराव जाधव, : अपिलार्थी
रा. शाहुनगर, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत, छत्र बोरगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६४४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. निलकंठ पंडितराव जाधव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, छत्र बोरगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. कुलकर्णी ए. ए. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. मोरे ए. एस. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१-०८-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०९-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३-१०-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-११-२००८ फेरसादर दिनांक |

१९-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०८-२००८ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्यापही प्राप्त झालेली नाही. सध्याचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पूर्वीच्या ग्रामसेवकाने पदभार दिला नसल्याने अपिलार्थीचा सदर माहितीचा अर्ज त्यांना प्राप्त झालेला नाही. तो अर्ज आज रोजी त्यांच्याकडे देण्यात आला. यासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी एकत्रित करावी व त्यानंतर अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. माळी एम. एस. यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. माळी एम. एस. यांना समज द्यावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निलकंठ पंडितराव जाधव, रा. शाहुनगर, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, छत्र बोरगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. समाधान रामभाऊ साळवे, : अपिलार्थी
मु. पो. केसापुरी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, केसापुरी,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६४५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. समाधान रामभाऊ साळवे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, केसापुरी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. एस. बी. लेंडाळ | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. मोरे ए. एस. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८-०५-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना अपूर्ण, चूक व दिशाभूल करणारी माहिती मिळाली आहे असे नमूद केले आहे व ही बाब अपिलार्थीच्या नजरेस आणून देण्यात येत आहे त्यामुळे अपिलार्थीस माहिती मिळाली आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. समाधान रामभाऊ साळवे, मु. पो. केसापुरी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, केसापुरी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मस्के मदन सुर्यभानराव, : अपिलार्थी
मु. पो. ज्ञानेश्वर नगर, डॉ. तट यांचे मागे, टाकी रोड,
अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मोरेवाडी,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मस्के मदन सुर्यभानराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मोरेवाडी,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०५-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २०-०५-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २२-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मस्के मदन सुर्यभानराव, मु. पो. ज्ञानेश्वर नगर, डॉ. तट यांचे मागे, टाकी रोड, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मोरेवाडी, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अभिमान्यू किसन झांजे, : अपिलार्थी
मु. केकत सारणी, पो. कळमअंबा, तालुका केज,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, केकत सारणी,
तालुका केज, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, केज,
तालुका केज, जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६४७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, केकत सारणी,<br>तालुका केज, जिल्हा बीड - श्री. श्रीकांत गोपीनाथ कांबळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, केज,<br>तालुका केज, जिल्हा बीड - श्री. निरडे अशोक आंगद | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९-१२-२००८ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावर दिनांक ३१-०३-२०१० रोजी राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर सुनावणी झाली होती. त्यावेळी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर तीस दिवसाच्या आत निर्णय पारीत करावा असे आदेश दिलेले आहेत. अपिलार्थीच्या दिनांक १९-१२-२००८ या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही असे दिसून येत आहे. याकरिता प्रकरण गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, जिल्हा बीड यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. यासंदर्भात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नसेल तर सुनावणी घेण्यात यावी व आयोगास खुलासा सादर करण्यात यावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अभिमान्यू किसन झांजे, मु. केकत सारणी, पो. कळमअंबा, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, केकत सारणी, तालुका

केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राऊत विश्वनाथ भागुजी,<br>रा. कानडी (माळी), तालुका केज, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कानडी (माळी), तालुका केज, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, तालुका केज, जिल्हा बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राऊत विश्वनाथ भागुजी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कानडी (माळी), तालुका केज, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, तालुका केज, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०३-२०१० रोजीचे प्रथम अपील केले आहे त्यावर सुनावणी झालेली नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन ०१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००९ पर्यंतची जनरल किर्द, गाव नमुना नंबर १० व ०९ च्या नकला, सर्व पावत्या नळ घर वसुली पट्टी इत्यादीबाबतची माहिती कानडी माळी या ग्रामपंचायतकडून मागितली आहे. तथापि ती माहिती त्यांना आजपर्यंत मिळालेली नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १५-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राऊत विश्वनाथ भागुजी, रा. कानडी (माळी), तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कानडी (माळी), तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख वसिमोद्दीन शेख जकीयोद्दीन,<br>मु. पो. नेकनूर, तालुका जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख वसिमोद्दीन शेख जकीयोद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नेकनूर, तालुका जिल्हा बीड<br>- श्री. कैलवाड व्ही. बी. | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - श्री. एस. एस. वीर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बीड<br>- श्री. जाधव यु. ए. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर माहिती देण्याचा कोणताही प्रयत्न केलेला नाही. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली नाही असे कथन केले आहे व त्यांना खालील माहिती आवश्यक आहे.

१. नेकनूर गावात पाणीपुरवठा नळयोजनेचे जे काम झाले आहे त्याचे अंदाजपत्रक.

२. सन २००९-२०१० या कालावधीत नेकनूर ग्रामपंचायतीस मिळालेल्या निधीचा तपशील.

३. नेकनूर या गावात ग्रामपंचायत हद्दीत दुकानाचे गाळे काढलेले आहे. त्यातील किती गाळे मागासवर्गीयांना दिले आहेत त्यांची नावे कळविण्यात यावी, दिली नसल्यास तसे कळविण्यात यावे.

सदरची माहिती अपिलार्थीस देय होत आहे व ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य द्यावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नेकनूर, जिल्हा बीड यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त होणा-या माहितीच्या अर्जांना अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नेकनूर, तालुका जिल्हा बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख वसिमोद्दीन शेख जकीयोद्दीन, मु. पो. नेकनूर, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नेकनूर, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मिर्झा खालेद बेग खुद्रतुल्ला, : अपिलार्थी
मु. पो. नेकनूर, तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नेकनूर,
तालुका जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६५० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मिर्झा खालेद बेग खुद्रतुल्ला | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नेकनूर, तालुका जिल्हा बीड - श्री. कैलवाड व्ही. बी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बीड - श्री. जाधव यु. ए. | : उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - श्री. वीर एस. एस. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांचे व्दितीय अपील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार सादर न करता सुमारे पन्नास दिवसांच्या विलंबाने सादर केले आहे. सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना या विलंबाची कारणमिमांसा देता आली नाही. त्यामुळे सदरचे दाखल केलेले व्दितीय अपील मुदतबाह्य ठरत असल्याने निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मिर्झा खालेद बेग खुद्रतुल्ला, मु. पो. नेकनूर, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नेकनूर, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. निर्मळ विजयानंद तुळशीराम, : अपिलार्थी
मु. पो. नेकनूर, तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नेकनूर,
तालुका जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६५१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे प्रतिनिधी - श्री. अशोक भातपुडे | : उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नेकनूर, तालुका जिल्हा बीड - श्री. व्ही. बी. कैलवाड | : उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - श्री. वीर एस. एस. | : उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बीड - श्री. जाधव यु. ए. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०१-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपील हे ५० दिवसांच्या विलंबाने सादर केलेले आहे. या विलंबाबाबत कोणतेही समर्थनीय कारण अपिलार्थी यांचे उपस्थित प्रतिनिधी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर देऊ शकले नाहीत.

प्रसंगवशात या प्रकरणातील माहितीचा अर्ज व व्दितीय अपील क्रमांक १६५०/२०१० मधील माहितीचा अर्ज व व्दितीय अपील हे एकसारखेच असल्याचे दिसून येत आहे, याची नोंद आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निर्मळ विजयानंद तुळशीराम, मु. पो. नेकनूर, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नेकनूर, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रीमती तौर अंजली कौतिकराव,<br>व्दारा, कवडे एन. डी., ०७ क, विद्यानगर, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. सरस्वती विद्यालय (माध्यमिक), सुभाष चौक, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती तौर अंजली कौतिकराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. सरस्वती विद्यालय (माध्यमिक), सुभाष चौक, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड - श्री. रोडे एस. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. बोरसे देविदास, उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-०६-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना संपूर्ण माहिती मिळाली नाही.

सध्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या कालावधीत ते मुख्याध्यापक नव्हते. या कालावधीतील माहिती तत्कालीन मुख्याध्यापकाकडे असल्यामुळे ते माहिती देऊ शकत नाहीत.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर विहित मुदतीत सुनावणी घेणे उचित ठरले असते. या सर्व बाबीवर तोडगा काढण्यासाठी प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन आपला निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती तौर अंजली कौतिकराव, व्दारा, कवडे एन. डी., ०७ क, विद्यानगर, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. सरस्वती विद्यालय (माध्यमिक), सुभाष चौक, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. म्हेत्रे दिपक मल्हारी, : अपिलार्थी

व्दारा, तिवटनकर के. एन., मथुरा निवास, जिल्हा परिषद कन्या प्रशाला रोड, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

जन अपिलीय अधिकारी, :

जिल्हा परिषद, माध्यमिक शिक्षण विभाग, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. वैद्यनाथ विद्यालय (माध्यमिक), परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. बोरसे देविदास, उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०६-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १६-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-०६-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. म्हेत्रे दिपक मल्हारी, व्दारा, श्री. तिवटनकर के. एन., मथुरा निवास, जिल्हा परिषद कन्या प्रशाला रोड, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. वैद्यनाथ विद्यालय (माध्यमिक), परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनोहर चिमाजी चाळक, : अपिलार्थी
सोमेश्वर चौक, संजयनगर, गेवराई, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यालयीन अधीक्षक, पंचायत समिती, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६५४

२ सुनावणीची तारीख दि. २२-०३-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
कार्यालयीन अधीक्षक, पंचायत समिती, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. सरपते डी. एस.

३.३ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, पंचायत : उपस्थित
समिती, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड
- श्री. सुर्यवंशी बी. के.

३.४ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. काळे जी. आर.

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०८-०३-२०१० च्या माहिती अर्जान्वये विशेष घटक व जवाहर विहीर योजनेसंदर्भात माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००१ ते अर्ज केल्याच्या दिनांकापर्यंतचा आहे. सदरची माहिती संकलीत करुन अपिलार्थीस दिनांक ०५-०४-२०१० रोजीच्या पत्राव्दारे रुपये ६१७ /- इतक्या शुल्काचा भरणा करावा असे कळविण्यात आले. अपिलार्थी यांनी या शुल्काचा भरणा केल्यानंतर २९६ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी मिळालेली माहिती अर्धवट व अपूर्ण आहे म्हणून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन त्यावेळी निर्णय दिला. दिनांक १८-०६-२०१० रोजी अपिलार्थीस अपूर्ण माहितीसंदर्भात मूळ अभिलेखे पाहणी करण्याबाबत कळविण्यात आले. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी दिनांक १२-०७-२०१० रोजी पाहणी केली व त्याबाबतची पोच जन माहिती अधिका-यास दिलेली आहे.

आयोगापुढील कागदपत्रावरुन वरील बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांचे व्दितीय अपील दिनांक ०९-०७-२०१० रोजीचे आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोहर चिमाजी चाळक, सोमेश्वर चौक, संजयनगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अमोल विलासराव वैद्य, : अपिलार्थी
जुन्या बसस्थानकासमोर, कृष्णाई नगर, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६५५

२ सुनावणीची तारीख दि. २२-०३-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी तथा उपस्थित
अधीक्षक, पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई,
जिल्हा बीड - श्री. सरपते डी. एस.

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पाडळसिंगी, तालुका गेवराई,
जिल्हा बीड - श्री. सोनवणे एस. बी.

३.३ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
ग्रामसेवक, ग्रामपंचायत, ताकडगांव, तालुका गेवराई,
जिल्हा बीड - श्री. वाघमारे जी. जी.

३.४ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
ग्रामसेवक, ग्रामपंचायत, आगर नांदुर, तालुका गेवराई,

जिल्हा बीड - श्री. करपे आर. एन.

| | | | |
|---|---|---|---|
| ३.५ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सेलू / मारानळा, तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. कांबळे एस. एम. | : | उपस्थित |
| ३.६ | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. तांदळे पी. एस. | : | उपस्थित |
| ३.७ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. काळे जी. आर. | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १५-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १३-०३-२०१० च्या अर्जान्वये चार ग्रामपंचायतीअंतर्गत माहिती मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस खालीलप्रमाणे दिनांक १०-०५-२०१० रोजी विनामूल्य देण्यात आली आहे व त्याबाबतची पोच अपिलार्थी यांनी दिली आहे असे उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कथन केले.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, आगर नांदुर, तालुका गेवराई, जिल्हा बीड | - | दिनांक १०-०५-२०१० रोजी माहिती दिली. |
| २ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, ताकडगांव, तालुका गेवराई, जिल्हा बीड | - | दिनांक १०-०५-२०१० रोजी माहिती दिली. |
| ३ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सेलू / मारफळी, तालुका गेवराई, जिल्हा बीड | - | दिनांक १०-०५-२०१० रोजी माहिती दिली. |
| ४ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पाडळसिंगी, तालुका गेवराई, जिल्हा बीड | - | दिनांक १०-०५-२०१० रोजी माहिती दिली. |

अपिलार्थी यांनी त्यांचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांच्याकडे केला होता. अपिलार्थीचा सदर माहितीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५

मधील कलम ६ (३) नुसार उपरोक्त चार ग्रामपंचायतीकडे दिनांक १८-०३-२०१० ला हस्तांतरीत करण्यात आला. अपिलार्थी यांना व्यक्तिशः माहिती देण्यात आली आहे व ती अपिलार्थी यांनी घेतली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये कथन केले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अमोल विलासराव वैद्य, जुन्या बसस्थानकासमोर, कृष्णाई नगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रमोद पोपटराव मिसाळ, : अपिलार्थी
शंकर स्मृती निवास, मंगळवार पेठ, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
आगार प्रमुख, राज्य परिवहन महामंडळ, अंबाजोगाई
आगार, बीड विभाग, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, बीड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६५६

२ सुनावणीची तारीख दि. २७-०३-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. प्रमोद पोपटराव मिसाळ : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
आगार प्रमुख, राज्य परिवहन महामंडळ, अंबाजोगाई
आगार, बीड विभाग, बीड - श्री. कच्छवे अमृतराव उत्तमराव

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, बीड
- श्री. बनसोडे रंगनाथ नारायणराव

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०३-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. २८-०४-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २७-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये सन १९९० ते २०१० या कालावधीतील अपघाताचे प्रमाण व त्याची घटनावार माहिती, कर्मचा-यांचे हाफडेबाबत परिपत्रक, EPKM व KPTL ची तसेच अंबाजोगाई येथे एकूण स्टॉफ किती आहे इत्यादीची माहिती मागितली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख, राज्य परिवहन महामंडळ, अंबाजोगाई आगार, बीड विभाग, बीड यांनी माहिती तयार ठेवली आहे तथापि अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती नेली नाही म्हणून सदर माहिती त्यांना देता आली नाही. अपिलार्थी यांनी सांगितले की, त्यांना माहिती तयार असल्याबाबत कळविण्यात आले नाही. यावर आयोगाचे मत असे आहे की, अपिलार्थीने व्यक्तिशः मागणी केली असल्याने ही माहिती ३० दिवसाच्या कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीची आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा एक संच बरोबर आणलेला आहे. तो आयोगाच्या सुचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आला आणि अपिलार्थी यांनी तो स्विकारला. कर्मचा-यांच्या हाफ-डेबाबत महामंडळाचे परिपत्रक कार्यालयास असल्यास त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी असे आयोगाने सूचित केले. या पार्श्वभूमीवर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रमोद पोपटराव मिसाळ, शंकर स्मृती निवास, मंगळवार पेठ, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख, राज्य परिवहन महामंडळ, अंबाजोगाई आगार, बीड विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जमीरोद्दीन मुनीरोद्दीन काझी, : अपिलार्थी
रा. ढोर गल्ली, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जमीरोद्दीन मुनीरोद्दीन काझी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड - श्री. ए. एस. लोखंडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड - श्री. एस. ए. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-०५-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये घर क्रमांक १११५ च्या बांधकाम पुर्णत्वाचा दाखल्याबाबत त्रयस्थाशी संबंधित माहिती मागितली आहे. परंतु सदर प्रकरण कोर्टात चालू असल्यामुळे माहिती देता येत नाही असा जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद केला. अपिलार्थी यांना सदरची माहिती कोर्टात सादर करावयाची असल्याने त्यांना या माहितीची आवश्यकता आहे असा त्यांनी युक्तिवाद केला. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक १५-०४-२०१० रोजी माहिती विनामूल्य देण्यात यावी असा निर्णय दिला. तथापि या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्रयस्थाची माहिती मागितलेली आहे याचा विचार केलेला दिसून येत नाही. त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे हे नैसर्गिक न्यायाच्या व पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. करिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन व अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, त्यांना देय होत असलेली माहिती तसेच त्रयस्थ पक्षाची बाजू ऐकून निर्णय पारित करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जमीरोद्दीन मुनीरोद्दीन काझी, रा. ढोर गल्ली, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भिमराव मिरगाजी घनघाव, : अपिलार्थी
रा. केसापूरी, पो. केसापुरी कॅम्प, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, केसापूरी,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय,
माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भिमराव मिरगाजी घनघाव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, केसापूरी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. एस. बी. लेंडाळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड<br>- श्री. मोरे ए. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०४-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १०-०५-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत केसापुरीकडून एकूण तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी २००६-०७ ते जानेवारी २०१० असा आहे. मुद्दा क्रमांक तीनमधील माहिती ग्रामपंचायतकडून अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टव्दारे पाठविण्यात आली आहे. तथापि अपिलार्थी यांनी ती मिळाली नाही असे त्यांनी कथन केले आहे. यास्तव जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेला माहितीचा एक संच आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी तो स्विकारला. मुद्दा क्रमांक १ व २ बाबत जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास कथन केले की, सदर माहिती ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नसते व याबाबतची नोंद त्यांनी त्यांच्या दिनांक ०७-०५-२०१० च्या प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये घेतली आहे. या सर्व बाबींचा विचार करता प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भिमराव मिरगाजी घनघाव, रा. केसापूरी, पो. केसापुरी कॅम्प, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, केसापूरी,

तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मदन ज्ञानोबा घनघाव, : अपिलार्थी
रा. केसापूरी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, केसापूरी,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मदन ज्ञानोबा घनघाव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, केसापूरी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. एस. बी. लेंडाळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. मोरे ए. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मौजे केसापुरी ग्रामपंचायतच्या विविध योजनांची विस्तृत अशी माहिती एकूण चार मुद्दयांवर सन २००६-०७ ते जानेवारी २०१० या कालावधीची मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस पोस्टाव्दारे दिनांक १३-०३-२०१० रोजी पाठविण्यात आलेली आहे. अपिलार्थीस सदरची माहिती मिळालेली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव यांनी दिनांक ०७-०५-२०१० सुनावणी घेतली होती त्यावेळी सुनावणीस अपिलार्थीस उपस्थित होते असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळालेली नाही असा युक्तिवाद त्यांनी आयोगासमोर केला. यास्तव आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे असलेला माहितीचा एक संच आयोगाच्या सुचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आला व अपिलार्थीने तो स्विकारला आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मदन ज्ञानोबा घनघाव, रा. केसापूरी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, केसापूरी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नारायण विश्वनाथराव बोर्डे, (प्रमुख कारागीर), : अपिलार्थी
राज्य परिवहन विभागीय कार्यशाळा, बार्शी रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बसस्थानकाजवळ, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बसस्थानकाजवळ, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बसस्थानकाजवळ, बीड<br>- श्री. बंडे विश्वनाथ व्यंकटराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बसस्थानकाजवळ, बीड - श्री. बनसोडे रंगनाथ नारायणराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०६-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २३-०७-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बीड यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०४-०५-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्यांची सेवाविषयक बाबींची एकूण पाच मुद्दयावर मागितली आहे. या माहिती अर्जास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार दिनांक २९-०५-२०१० रोजी विहित मुदतीत प्रतिसाद देऊन जी माहिती उपलब्ध आहे ती कळविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी काही मुद्दयांवर प्रश्नार्थक स्वरुपात खुलासेवजा व स्पष्टीकरणात्मक अशी माहिती मागितली आहे ती देण्यात आलेली नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी माहिती मिळाली आहे तथापि अपुरी माहिती मिळाली आहे. समाधानकारक माहिती मिळाली नाही असे नमूद केले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती उपलब्ध होती ती त्यांना देण्यात आली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे तशी देय होते. माहिती संस्करण करुन देता येत नाही व प्रश्नार्थक माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहितीच्या व्याख्येनुसार देय होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिलेली आहे असे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण विश्वनाथराव बोर्डे, (प्रमुख कारागीर), राज्य परिवहन विभागीय कार्यशाळा, बार्शी रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बसस्थानकाजवळ, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बसस्थानकाजवळ, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मुश्ताक छोटुमिया कुरेशी,<br>मटन मार्केट, कोल्हेर रोड, गेवराई, तालुका गेवराई,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा वक्फ अधिकारी, जिल्हा वक्फ बोर्ड कार्यालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा वक्फ अधिकारी, जिल्हा वक्फ बोर्ड कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ३०-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, जिल्हा वक्फ बोर्ड कार्यालय, बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, जिल्हा वक्फ बोर्ड कार्यालय, बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुश्ताक छोटुमिया कुरेशी, मटन मार्केट, कोल्हेर रोड, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, जिल्हा वक्फ बोर्ड कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अनिल रावसाहेब पवार,<br>मु. पो. अंमळनेर, तालुका पाटोदा, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. उपविभाग, पाटोदा, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित कार्यालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. उपविभाग, पाटोदा, जिल्हा बीड<br>- श्री. व्यंकट राणबा गांधले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. जी. के. सामसे, उप कार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०५-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २६-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये स. नं. ३२० (इनाम) येथील ट्रान्सफॉर्मर शिफ्टींग-बाबतची माहिती मागितली आहे. त्याबाबत दिनांक १८-०५-२०१० ला विहित मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस कळविण्यात आले आहे की, अंमळनेर येथील स. नं. ३२० मधील सदरील डीपी बसविल्याच्या तारखेपासून त्याच जागी आहे इतरत्र कोठेही हलविली नाही, त्यामुळे इतर माहिती जसे की, शिफ्ट करण्याचे कारण, शिफ्टींग चॉर्ज इत्यादी बाबींचा संबंध येत नाही. त्यांनी पुढे आयोगास असेही कथन केले की, अपिलार्थी यांचे या माहितीवर समाधान न झाल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०७-२०१० रोजी सुनावणी घेऊन अचूक माहिती देण्याचे आदेश दिले आहेत. यानुसार कागदपत्रांची पाहणी केली असता डीपी इतरत्र हलविण्याचे दिसून येत नाही. ही बाब विचारात घेता अपिलार्थीस दिनांक १२-०५-२०१० च्या कनिष्ठ अभियंत्याच्या अहवालाची प्रत व दिनांक १८-०५-२०१० च्या शेतकरी ग्राहकांनी दिलेल्या लेखी माहितीची प्रत नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविण्याची व्यवस्था करावी या निष्कर्षाप्रत आयोग येत असून प्रकरण या टप्प्यावर बंद करण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिल रावसाहेब पवार, मु. पो. अंमळनेर, तालुका पाटोदा, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी

मर्या. उपविभाग, पाटोदा, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हरीदेव लक्ष्मण कुंभार, : अपिलार्थी
मु. पो. राधा टॉकीज जवळ नवनाथ नगर, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
श्री पंडित गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्राचार्य, श्री पंडित गुरुपार्डीकर कला महाविद्यालय,
सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६६३

२ सुनावणीची तारीख दि. २७-०३-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
मुख्य लिपीक, श्री पंडित गुरुपार्डीकर कला महाविद्यालय,
सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड
- श्री. साबळे ज्ञानेश्वर भिमराव

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
प्राचार्य, श्री पंडित गुरुपार्डीकर कला महाविद्यालय,
सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड
- डॉ. एम. बी. धोंडगे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १९-०४-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. १०-०५-२०१०

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २२-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०७-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरीदेव लक्ष्मण कुंभार, मु. पो. राधा टॉकीज जवळ नवनाथ नगर, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक, श्री पंडित गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, श्री पंडित गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सखाराम जिजाभाऊ नाईकनवरे, : अपिलार्थी
मु. ब्रम्हगांव, पो. माजलगांव, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, कृषि विभाग, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६६४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लिपीक, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माजलगांव, जिल्हा बीड - श्री. एम. ए. सिध्दीकी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, माजलगांव, जिल्हा बीड<br>- श्री. वसंत राठोड | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०६-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १३-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती निरंक आहे असे अपिलार्थीस दिनांक २९-०२-२०१२ रोजी कळविण्यात आले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपिलार्थीने मातिलेली माहिती त्यांना विहित मुदतीत देण्याबाबत दक्षता घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सखाराम जिजाभाऊ नाईकनवरे, मु. ब्रम्हगांव, पो. माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जवाहरलाल झुंबरलाल नहार,<br>रा. हिरालाल चौक, बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जवाहरलाल झुंबरलाल नहार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. जोगदंड सी. आर. अ. का. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या रॉकेल परवान्याबाबतची माहिती मागितली आहे. सदरची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांच्या कार्यालयात नसून ती तहसील कार्यालयात उपलब्ध आहे तेथून ती प्राप्त करुन घ्यावी असा निर्णय जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ३१-०५-२०१० रोजी दिला आहे. सदरचे अभिलेखे अद्याप पावेतो अपिलार्थीस प्राप्त झालेले नाही याकरिता सदरचे अभिलेखे मागवून घेऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. अभिलेखे जुने असल्याकारणाने अपिलार्थी किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी शोधण्यासाठी मदत करावी व त्याबाबतचा संदर्भ जन माहिती अधिकारी यांना द्यावा व समन्वयाने काम करावे.

सदरची बाब अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी पहावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिश: उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जवाहरलाल झुंबरलाल नहार, रा. हिरालाल चौक, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. त्रिंबक पंढरीनाथ ठोंबरे, : अपिलार्थी
रा. उंदरी, ता.केज, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव, श्री दामोधर हरिभाऊ लांडगे,
श्री शिवछत्रपती, सार्वजनिक वाचनालय, उंदरी,
ता,केज,जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक ग्रंथालय संचालक,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. त्रिंबक पंढरीनाथ ठोंबरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सचिव, श्री शिवछत्रपती, सार्वजनिक वाचनालय, उंदरी, ता,केज,जि.बीड - श्री दामोधर हरिभाऊ लांडगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक ग्रंथालय संचालक,औरंगाबाद - श्री. सु.रा.रोकडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर युक्तिवादात कथन केले की, अपिलार्थी यांना मागील एका माहितीच्या अर्जासंदर्भात आयोगाने निर्णय दिल्याप्रमाणे १३०० पृष्ठांची माहिती विनामूल्य देण्यात आलेली आहे. या माहिती अर्जान्वये त्यांनी सन २००८ ते २००९ मध्ये श्री शिवछत्रपती सार्वजनिक वाचनालय,उंदरी, ता. केज, जि.बीड या वाचनालयाचे कोणत्या बँकेत खाते आहे व त्या खात्याचे सचिव व अध्यक्ष यांची नावे अशी माहिती मागितली आहे. माहितीचा अर्ज दि. ३१.०३.२०१० रोजीचा असून विहित मुदतीत दि. २०.०४.२०१० रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन शुल्काचा भरणा करावा, असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

यास्तव जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज उपलब्ध असलेली एका पृष्ठाची माहिती आयोगाच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली आहे.

या टप्प्यावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. त्रिंबक पंढरीनाथ ठोंबरे, मु. पो. उंदरी, ता. केज, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री शिवछत्रपती सार्वजनिक वाचनालय, उंदरी, ता.केज,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय संचालक,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वनाथ काशीनाथ जाधव, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, घनसावंगी,
जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, घनसावंगी, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल-१) तहसील, घनसावंगी, जि.जालना - श्री. एल.डी.सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, घनसावंगी जि.जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० (फेरसादर दि.०४.०८.२०१०) |

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांचे द्वितीय अपील विलंबाने सादर केल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल करण्याच्या कालमर्यादा विहित केलेल्या आहेत. अपिलार्थी यांनी विलंबाकरिता समर्थनीय कारण त्यांच्या लेखी युक्तिवादात देखील दिलेले नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वनाथ काशीनाथ जाधव, उमाकिरण समोर, पांगरी रोड, शाहुनगर, बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१) तहसील कार्यालय, घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बागबान आजम युसुफ, : अपिलार्थी
रा.अंबाजोगाई, जि.बीड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय,अंबाजोगाई,जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय,अंबाजोगाई,
जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बागबान आजम युसुफ | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील ॲड. शिवाजी देवाजी कांबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,अंबाजोगाई, जि.बीड- श्रीमती एस.एल.जोगदंड | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी -तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, त्यांचे वकील व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे अपिलार्थी यांच्यातर्फे त्यांच्या वकिलांनी युक्तिवादात कथन केले की, त्यांनी त्यांच्या दि. ०७.०५.२०१० रोजीच्या माहितीअर्जान्वये अंबाजोगाई तालुक्यातील स्वस्तधान्य दुकानदार व रॉकेल वितरणाविषयी माहिती मागितली आहे. माहिती एकूण १७ मुद्यांची आहे.माहितीचा कालावधी सन २००४ ते अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत म्हणजे दि.०७.०५.२०१० पर्यंतचा आहे. त्यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई यांनी आज सुनावणीस अनुपस्थित राहण्याची अनुमती आयोगास मागितली आहे. तसेच त्यांनी आयोगास विनंती केली की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व जुनी असल्याकारणाने माहिती देण्यासाठी दोन महिन्याचा कालावधी देण्यात यावा.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी एकूण २२ वर्षांची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. ही बाब विचारात घेता आयोगाने सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती स्वेच्छेने कमी केली व त्यांना खालील नेमकी माहिती देण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली.

१) अंबाजोगाई शहरामध्ये एकूण दारिद्रयरेषेखालील कार्डधारकाची यादी (आज रोजीची अद्ययावत)

२) अंबाजोगाई शहरामध्ये सर्वसाधारण कार्डधारक असलेल्या संख्या, प्रत्येक स्वस्तधान्य दुकानदारांकडे निश्चित केलेल्या कार्डधारकांची संख्या, त्याचप्रमाणे प्रत्येक दुकानदारांकडील

३) स्वस्तधान्य दुकानांची संख्या

४) अंबाजोगाई शहरातील वॉर्डहिाय स्वस्तधान्य दुकानांची यादी.

५) एका कार्डधारकास एका युनिटप्रमाणे करण्यात येणाऱ्या धान्य वितरणाबाबतचा तपशील.

६) शासनाच्या नियमानुसार बीपीएल, अंत्योदय, एपीएल या कार्डधारकांना अनुज्ञेय असलेल्या रॉकेल, धान्याबाबतचे नियतन

७) स्वस्तधान्य दुकान तसेच रॉकेल हॉकर्स यापैकी ज्याच्यावर गुन्हे दाखल झालेली आहेत त्यांची नावे. तसेच रद्द झालेल्या स्वस्तधान्य दुकानदार व रॉकेल विक्रेत्यांची नावे

८) उपरोक्त धान्य विक्रेते व रॉकेल विक्रेत्यांचे शासनाकडून वाटपाबाबत नियत कालावधी शासनाने निश्चित केलेला कालावधी व दिलेला माल याबाबत शासनाचे परिपत्रक

९) सन २००७-२०१० या कालावधीमध्ये जे विक्रेते मयत झाले त्यांच्या जागी ज्या व्यक्तींना परवाना दिला आहे. त्यांची नावे.

वरील माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे. अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे दोन महिन्याचे आत विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अंबाजोगाई, यांनी वर नमूद केलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०३-२०१२**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बागवान आजम युसुफ, रविवार पेठ, बागवान गल्ली, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. दिपक उत्तमराव गव्हाणे,<br>रा. वाघोली, पो.आडस, ता.धारुर, जि.बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन धारुर, ता.धारु,जि.बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक,बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन धारुर, जि.बीड - श्री. आंगद ज्ञानोबा सुडके | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -पोलीस अधीक्षक,बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकूण दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे. पहिला मुद्दा दि.१४.०१.२०१० रोजी दिलेल्या

फिर्याद नं. ६१ संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितली असून दुसऱ्या मुद्यांमध्ये, कार्यवाही झाली नसेल तर एवढी दिरंगाई का व कशासाठी, अशी प्रश्नार्थक, खुलासेवजा माहिती मागितली आहे. अधिनियमातील कलम २(च) नुसार प्रश्नार्थक खुलासेवजा माहिती देय होत नाही. मुद्दा क्र. १ मधील माहिती देय होत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस माहितीच्या प्रती मोफत देण्यात आलेल्या आहेत व सदरची माहिती मुदतीत न पुरविल्याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, केज यांच्याकडून चौकशी करुन अहवाल मागविण्याबाबत आदेशित केलेले आहे, असे नमूद करुन अपील अर्ज निकाली काढलेला आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती देय होत आहे, ती माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. ही बाब विचारात घेता, जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, बीड यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिपक उत्तमराव गव्हाणे, रा.मु.वाघोली, पो. आडस, ता. केज,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन धारुर, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. आसाराम आत्माराम दोडताले,<br>रा. पायतळवाडी,ता.माजलगाव,जि.बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, माजलगाव,<br>जि.बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, माजलगाव, जि.बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| | सहायक जन माहिती अधिकारी - लिपीक, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माजलगाव,जि.बीड - श्री. एम.ए.सिद्दीकी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माजलगाव,जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषिी अधिकारी, माजलगाव, जि.बीड - श्री. व्ही.जी.राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६.०७.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१.०८.२०१०

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे कार्यालयाच्या नोटीसबोर्डवरही करण्यात आली आहे. या बाबी अपिलार्थीस ज्ञात आहेत. तथापि यांना मागितलेली सविस्तर माहिती जन माहिती अधिकारी यांनी स्वखर्चाने दि. ३१.०७.२०१० पर्यंत डाकेने पाठविण्यात यावी, असे जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये नमूद केले आहे. त्यानुसार अपिलार्थीस दि. २७.०७.२०१० रोजी अपिलार्थीस पोस्टाने पाठविण्यात आली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आसाराम आत्माराम दोडताले, रा. पायतळवाडी,पो.कि.आडगाव,ता.माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. इनामदार खैरोद्दीन हबिबोद्दीन, : अपिलार्थी
रा. माजलगाव,जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, महसूल क्र.१,तहसील कार्यालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६७१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. इनामदार खैरोद्दीन हबिबोद्दीन | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ११.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, त्यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सन १९६१-६२ व त्यापूर्वी हैद्राबाद कुळ कायदा कलम ५०(ब) प्रमाणे देवस्थान सेवा इनाम जमिनीवर प्रतिबंधीत मालक म्हणून ७/१२ चे मालकी रकान्यात फेरफाराचा क्रमांक न दर्शविता नोंदी घेण्यात

आल्या आहेत. असे सर्व्हे क्र.१११, ११२,११३,११५ व ११६ चा उल्लेख करुन एकंदर १३ व्यक्तींची नावे नमूद केलेली आहेत. सदरच्या कागदपत्रांची पाहणी त्यांना देण्यात आली आहे. ७/१२ चे रेकॉर्ड त्यांना दाखविण्यात आले. तथापि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा 'ब' व 'क' शी संबंधित खालील माहितीची आवश्यकता आहे.

(ब) मुद्दा क्र. १ ते ५ मध्ये नमूद लोकांची नावे कोणाच्या आदेशावरुन लावण्यात आले हे कुळ विभागातील दप्तरावरुन अशा आदेशाचा क्रमांक व दिनांक कुळ कायद्याचे कलमासह देण्यात यावा तसेच हा आदेश कोणत्या अधिकाऱ्याने दिला त्याचे पदनाम कळविण्यात यावे.

(क) वरील व्यक्तींची नावे ७/१२ चे मालकी रकान्यात ज्या फेरफाराची नोंद प्रमाणित करुन नोंदविण्यात आले त्याचा फेरफार नोंद क्रमांक व तो मंजुर केल्याचा दिनांक ही नोंद घेतलेल्या तलाठयाचे नाव आणि मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनामासह माहिती. या फेरफाराच्या नकलासह माहिती.

अपिलार्थी यांच्या वरील युक्तिवादावरुन हे स्पष्ट होत आहे की, ७/१२ वर मालकीहक्काच्या रकान्यामध्ये ज्या फेर व्यवहाराची नोंद करण्यात आली होती.त्यासंदर्भातील रजिस्टरवरील नोंद ज्या पृष्ठावर असेल त्या पृष्ठाची प्रत तसेच त्या संदर्भात कुळ घोषित केलेल्या आदेशाची प्रत व कूळ कायद्याच्या कलमासह फेरफाराची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे व 'ब' व 'क' संदर्भातील कागदपत्रांची पाहणी अपिलार्थीस देण्यात यावी. यासाठी जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. यासंदर्भात अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळविण्यात यावे.

आज रोजी जन माहिती व अपिलीय अधिकारी दोघेही अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक आहे. याकरिता सुनावणीची पुढील तारीख दि. ०८.०६.२०१२ रोजी सकाळी ११.३० अशी निश्चित करण्यात येत आहे. तत्पूर्वी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय,लातूर यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे माहितीची पाहणी द्यावी, असे आयोगाचे निदेश आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. ०८.०६.२०१२ रोजी सकाळी ११.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. इनामदार खैरोद्दीन हबिबोद्दीन,रा.शाहूनगर, महसूल कॉलनी,ग्रामीण पोलीस स्टेशन समोर, माजलगाव,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल क्र.१), तहसील कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. खुशिदोद्दीन पि.मो.जमालोद्दीन, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पोलीस अधीक्षक,
जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय,बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय,बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. खुशिदोद्दीन पि.मो.जमालोद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड - श्री. संभाजी सुदाम कदम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व  जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.  जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०२.०६.२०१० मूळ अर्जाद्वारे त्यांच्या दि. १७.०३.२०१० रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भात माहिती मागितली आहे. ती माहिती त्यांना दि. ०८.०६.२०१० रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली आहे. यासंदर्भात अपिलार्थीची काही शंका असल्यास योग्य त्या न्यायाधिकरणाकडे दाद मागू शकतात. यास्तव जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही. अपिलार्थीचे अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खुशिदोद्दीन पि.मो.जमालोद्दीन,रा.भंडार गल्ली, जुना बाजार, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,पोलीस अधीक्षक कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. महादेव भिमराव केंद्रे, | : | अपिलार्थी |
| | रा. भोजनवाडी, परळी वै., | | |
| | जि.बीड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| | पोलीस अधीक्षक कार्यालय,बीड | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | पोलीस महानिरीक्षक,औरंगाबाद | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधीक्षक (मु.), बीड- श्री. व्ही.एम.काळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अपर पोलीस अधीक्षक,बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०२.०२.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये त्यांनी यापूर्वी दाखल केलेल्या दि. ०७.१०.२००९ रोजीच्या अर्जाची नक्कल अशी माहिती मागितली होती. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. माहिती पुरविण्याकरिता दि. १९.०२.२०१० रोजी विहित मुदतीत ₹१०/- शुल्काचा भरणा करावा, असे कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी त्याच दिवशी शुल्काचा भरणा केला. तथापि अपिलार्थी कार्यालयात उपस्थित झाले नाहीत.

वरील बाबी कागदपत्रांवरुन दिसून येत आहेत. अर्जदाराने व्यक्तिशः माहिती अपेक्षित केली असल्यास त्यांच्या माहिती अर्जासंदर्भातील पुढील संपूर्ण घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केला आहे. तथापि माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात व्यक्तिशः संपर्क साधल्याचे दिसून येत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मु.), पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच उपरोक्त माहिती तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादेव भिमराव केंद्रे,रा. भोजनवाडी, परळी वै.,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मु.), बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रल्हाद नामदेव झिरपे, : अपिलार्थी
रा. धुमेगाव, पो. अर्ध-पिंप्री,
ता.गेवराई, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, धुमेगाव, पो. अर्ध-पिंप्री,
ता.गेवराई, जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गेवराई, ता. गेवराई, जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रल्हाद नामदेव झिरपे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत धुमेगाव, ता.गेवराई,जि.बीड - श्री. घसिंग आर.वाय | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई,जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी धुमेगाव पो.अर्धपिंप्री या ग्रामपंचायतीचे सर्व बँकेच्या खातेउतारे मागितले आहेत. माहितीचा कालावधी दि. ०१.०१.२००६ ते ०३.०६.२०१० असा आहे. जन माहिती अधिकाी यांनी सदरची माहिती गट विकास अधिकारी यांच्याकडे सादर केली आहे. तथापि अपिलार्थी यांना मिळालेली नाही. आयोगाने विचारणा केली असता तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाचही बँकेच्या खातेपुस्तिकांच्या छायाप्रती आज रोजी उपलब्ध असल्याचे व सोबत आणल्याचे त्यांनी आयोगासमोर कथन केले. आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आले.

या सर्व बाबी पाहता प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. झिरपे प्रल्हाद नामदेवराव, रा.धुमेगाव, पोस्ट अर्धपिंपरी, ता.गेवराई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत धुमेगाव, ता.गेवराई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजाराम मारुती पवार,<br>रा. मांडवा, पो.कडा साखर , ता.आष्टी, जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी,<br>गट-अ, समाजकल्याण कार्यालय,जि.प.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी,<br>गट-अ, समाजकल्याण कार्यालय,जि.प.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - समाजकल्याण अधिकारी, गट-अ, समाजकल्याण कार्यालय,जि.प.बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस. एच.बांगर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता (अपंग शाखा) | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - समाजकल्याण अधिकारी, गट-अ, समाजकल्याण कार्यालय,जि.प.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १३.०९.२०१०

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, संबंधित मुख्याध्यापकाने अर्जदारास हवी असलेली माहिती दि. २८.०६.२०१० च्या पत्राद्वारे पाहच देय डाकेने पाठविले असता सदरची माहिती घेण्यास अर्जदाराने नकार दिलेला आह. पोस्टाद्वारे अर्जदारास दि. ३०.०६.२०१०, ०१.०३.२०१०,०२.०७.२०१०,०३.०७.२०१० असा सतत संपर्क करुन टपाल देण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र अर्जदाराने दि. ०५.०७.२०१० रोजी स्पष्टपणे नकार देऊन माहिती परत पाठविलेली आहे. दरम्यान अर्जदार उक्त माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती न मिळाल्यामुळे दि. ०२.०६.२०१० रोजी प्रथम अपील सादर केले. त्यावर दि. २१.०६.२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यासमोर सुनावणी घेऊन अर्जदारास आवश्यक माहिती पुरविण्याबाबत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांना सूचना दिल्या त्यानुसार अपिलार्थीस माहिती पोस्टाद्वारे पाठविली असता अर्जदाराने नकार कळविलेला आहे. तदनंतद त्यांचे निवेदन दि. १६.०७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे निर्णय कळवून निकाली काढण्यात आले आहे.

वरील बाबी व युक्तिवादावरुन या बाबी दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये व्यक्तिशः माहिती मागितली आहे. तथापि माहिती स्वीकारण्यासाठी ते व्यक्तिशः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविलेली माहिती अपिलार्थी यांनी स्वीकारली नाही.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजाराम मारुती पवार, मु.मांडवा, पो.कडा साखर, ता.आष्टी, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी,गट-अ, समाजकल्याण कार्यालय,जि.प.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, समाजकल्याण कार्यालय,जि.प.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. द्रौपती पांडुरंग लोणके, | : | अपिलार्थी |
| २ | श्री. तुकाराम दगडु लोणके, | | |
| | रा. फुलसांगवी, तालुका शिरुर (का.), जिल्हा बीड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना, बीड | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | अपर जिल्हाधिकारी, बीड | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. तुकाराम दगडु लोणके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना, बीड | | |
| | - श्री. महेंद्रकुमार श्रीरंगराव कांबळे | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | अपर जिल्हाधिकारी, बीड | | |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०-०९-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. तुकाराम दगडु लोणके, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी सौ. द्रौपती पांडुरंग लोणके व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०५-२०१० च्या माहिती अर्जान्वये खालील माहिती मागितली आहे.

१. उप सचिव महसूल व वन विभाग यांनी पाठविलेल्या दिनांक ०६-०१-१९९० च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीच्या प्रती.

२. अपिलार्थी अल्पभूधारक आहेत काय व रोहयोबाबत पात्र आहेत काय यासंबंधी शासनाचे आदेश, परिपत्रकाची प्रत.

३. नैसर्गिक आपत्तीसाठी केंद्र तसेच महाराष्ट्र शासनकडून दिनांक २३ व २४ जुलै १९८९ रोजी निधी प्राप्त झाला असल्यास त्याचा तपशील. तसेच रोहयो अंतर्गत नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भात करावयाच्या कामाबाबतच्या परिपत्रकाची प्रत.

४. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी ज्या अल्पभूधारकांना फायदा मिळाला आहे त्यांची नावे.

५. रोजगार हमी योजनेअंतर्गत अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर विहिरीची कामे घेण्याबाबत व जुन्या विहिरी खोल करण्याबाबत नियोजन विभागाचे दिनांक २४-१२-१९९१ चे आदेश, त्या आदेशाची प्रत, त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीच्या प्रती.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय (नैसर्गिक आपत्ती), बीड व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना दिनांक ०५-०७-२०१० रोजीच्या पत्रान्वये पाठविला आहे. अपिलार्थीस त्यांच्या माहितीच्या अनुषंगाने उपलब्ध माहिती उपलब्ध करुन दिली. या अर्जावर कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी त्यांच्याशी संबंधित माहिती दिनांक २०-०७-२०१० रोजी पाठविली आहे. अपिलार्थी यांना परस्पर कळविलेले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, (नैसर्गिक आपत्ती), बीड यांनी दिनांक ०१ सप्टेंबर २०१० रोजी अपिलार्थी यांना कळविले आहे की, माहिती २१ वर्षे जुनी असल्याकारणाने शोध घेऊनही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. माहिती रोहयो विभागाच्या संबंधात असल्यामुळे आपला अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांना मुद्दा क्रमांक १, २ व ३ बाबत दिनांक २८-१०-२०१० रोजीच्या पत्राने कळविण्यात आले.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, उपजिल्हाधिकारी (रोहयो), बीड यांनी त्यांच्या कार्यालयातील दोन कर्मचा-यांचा एक गट तयार करावा व त्यांच्या-मार्फत माहितीचा शोध घेण्यात यावा, शोध घेतलेल्या बाबींची दैनंदिनी ठेवावी. याकरिता अपिलार्थी यांना सहभागी करुन घ्यावे. त्यासाठी अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी सहमती

दर्शविली आहे. शोध घेतल्यानंतर अपिलार्थीस कळवावे. माहिती उपलब्ध झाल्यास अपिलार्थीस द्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तुकाराम दगडु लोणके, रा. फुलसांगवी, तालुका शिरुर (का.), जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कांबळे राहुल गोरोबा, : अपिलार्थी
मु. कानडी, पो. पिंपळगांव (गाढे), तालुका परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६७७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. टी. वाय. जाधव, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी | : उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. पी. पी. निंभोरे लघुलेखक उच्च श्रेणी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२-०८-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-१०-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा दिनांक १५-०६-२०१० चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०६-२०१० रोजी तहसीलदार, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) नुसार वर्ग केलेला आहे व त्याची प्रत अपिलार्थीस दिलेली आहे. अपिलार्थी यांनी मौजे कानडी येथील स्वस्त धान्य दुकानाबाबत माहिती मागितली आहे. तहसीलदार, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे हे आढळून येत नाही. तथापि अपिलार्थीस जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी दिनांक १५-०३-२०१२ रोजी माहिती पाठविल्याचे आढळून येत आहे. याकरिता जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी तहसीलदार, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांच्या कार्यालयातील सदरची माहिती संकलीत करुन अपिलार्थीस पाठविण्यासाठी जे कोणी अधिकारी कर्मचारी जबाबदार आहेत त्यांची चौकशी करुन विलंबाची कारणे संयुक्तीक आढळून न आल्यास त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कांबळे राहुल गोरोबा, मु. कानडी, पो. पिंपळगांव (गाढे), तालुका परळी वैजनाथ,

जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद अजीज सय्यद गफुर मुलानी, : अपिलार्थी
मु. पो. कडा, प्राथमिक शाळा नं. २ जवळ, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, बीड - श्री. गणेश नि-हाळी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २०-०४-२०१० च्या माहिती अर्जान्वये कसबे कडा, तालुका आष्टी येथील दर्गा व मस्जिदचे इनामी जमिनीबाबत हैद्राबाद अतियात ॲक्ट सन १९५२ च्या संदर्भानुसार एकूण सात मुद्दयांवर माहिती मागितली आहे. सदरच्या माहितीच्या संदर्भात नेमकी माहिती विचारली नसल्यामुळे आणि प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारली असल्यामुळे कार्यालयात उपस्थित राहून संचिकेची पाहणी करावी असे अपिलार्थीस दिनांक ०७-०७-२०१० रोजी कळविले आहे. त्यावर अपिलार्थी यांची पोच पावती आहे. तसेच अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील संचिका दिनांक ३०-०७-२०१० रोजी अपिलार्थीस पाठविली आहे. त्यामध्ये ४७ पृष्ठांचा समावेश आहे. अपिलार्थी यांनी पाहणीसाठी प्रतिसाद दिलेला नाही. या सर्व बाबी कागदपत्रावरुन दिसून येत आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना प्राप्त झालेली माहिती योग्य असल्याचे त्यांना वाटत नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस माहितीची पाहणी देणे उचित ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीअन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, बीड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद अजीज सय्यद गफुर मुलानी, मु. पो. कडा, प्राथमिक शाळा नं. २ जवळ, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. चंद्रभान नामदेव घडसे, | : | अपिलार्थी |
| | मु. पो. शेलापुरी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| | जिल्हा पुनर्वसन कार्यालय, बीड | | |
| | जन अपिलीय अधिकारी, | : | |
| | जिल्हा पुनर्वसन कार्यालय, बीड | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. चंद्रभान नामदेव घडसे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुनर्वसन अधिकारी, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी - श्रीमती बुंदेके पी. एस., अ. का. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये श्री. चंद्रभान नामदेव घडसे, रा. शेलापुरी, श्रीमती समाबाई नामदेव घडसे रा. शेलापुरी व सत्यप्रेम चंद्रभान घडसे रा. शेलापुरी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांची माजलगांव धरण टप्पा नंबर २ मध्ये जमीन / घर गेले आहेत तरी वरील बाबतीचे प्रमाणपत्र अशी माहिती मागितली आहे. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्याप माहिती मिळाली नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १६-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०३-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रभान नामदेव घडसे, मु. पो. शेलापुरी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भाऊसाहेब बाळासाहेब माखले, : अपिलार्थी
रा. मिरगांव, पो. अंतरवली, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६८० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भाऊसाहेब बाळासाहेब माखले | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. बी. एस. मोराळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. एस. झेड राऊत | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८        राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख        दि. १०-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २१-०६-२०१० च्या माहिती अर्जान्वये जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या दिनांक २७-०२-२००९ व दिनांक २०-०९-२००९ च्या पत्रावर काय कार्यवाही केली याबाबत अहवाल व पत्राच्या प्रती मागितल्या आहेत. या प्रक्रियेमध्ये अपिलार्थीच्या अर्जाच्या वेळी कार्यवाही झाली नव्हती असे दिनांक ०८-०३-२०११ रोजी पोस्टाने कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी झालेल्या चौकशीच्या अहवालाच्या पत्राच्या प्रती मागितल्या आहेत. सार्वजनिक वितरण प्रणालीसंदर्भात सदरचे पत्रे आहेत असे अपिलार्थी यांनी कथन केले आहे. यामुळे ही बाब व्यापक जनहिताशी संबंधीत असल्याने चौकशी / कार्यवाही त्वरीत होणे प्रशासनाच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणून आज रोजी उपलब्ध असलेली कागदपत्रे अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविण्यात यावीत, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, जिल्हा बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक  २८-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.  श्री. भाऊसाहेब बाळासाहेब माखले, रा. मिरगांव, पो. अंतरवली, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद खलीकुज्जमा पि. शमशुज्जमा,<br>बाराभाई गल्ली, मिलिया शाळेसमोर, अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद खलीकुज्जमा पि. शमशुज्जमा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची गंभीर दखल आयोगाने घेतली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०८-०६-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद खलीकुज्जमा पि. शमशुज्जमा, बाराभाई गल्ली, मिलिया शाळेसमोर, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. राधाबाई भ्र. किसनराव मुळी, : अपिलार्थी
व्दारा, के. आर. मुळी, समता कॉलनी, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी, :
नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील - ॲडव्होकेट - श्री. सचिव गो. जोशी | : | उपस्थित |
| ३.३ | अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. दत्तात्रय रत्नेश्वर मुळी | : | उपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी तथा एस. आय., नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जिल्हा बीड - श्री. के. टी. सावंत | : | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जिल्हा बीड - श्री. पी. के. पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे वकील, प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या वकिलाने सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची आयोगास विनंती केली. त्यांची ही विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक १२-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. राधाबाई भ्र. किसनराव मुळी, व्दारा, के. आर. मुळी, समता कॉलनी, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा एस. आय., नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भगवान बाबुराव धुमाळ, : अपिलार्थी
रा. मांडवा, पो. कडा साखर कारखाना, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, आष्टी, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, आष्टी, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६८३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड - श्री. ए. बी. गांगर्डे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, आष्टी, तालुका आष्टी,<br>जिल्हा बीड - श्री. एस. एम. गोलेकर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०७-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०५-१०-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी मौजे मांडवा शिवारात सन २००७ ते मार्च २०१० या कालावधीत वर्षनिहाय पाणलोट विकास अंतगर्त झालेल्या कामांची माहिती मागितली आहे. अपिलार्थीस दिनांक ०५-०७-२०१० रोजीच्या पत्राव्दारे माहिती प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही चालू आहे माहिती प्राप्त होताच देण्यात येईल असा प्रथम प्रतिसाद देण्यात आला आहे. माहिती प्राप्त होताच देण्यात आली आहे. अपिलार्थीने माहिती मिळाल्याची पोच दिलेली आहे. ती त्यांच्या दप्तर दाखल आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भगवान बाबुराव धुमाळ, रा. मांडवा, पो. कडा साखर कारखाना, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा

बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण माणिकराव राऊत, : अपिलार्थी
डॉ. जुजगर हॉस्पिटलसमोर, डॉ. उरणे यांचा बंगला,
शाहुनगर, रजिस्ट्री कार्यालयामागे, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६८४

२ सुनावणीची तारीख दि. २८-०३-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. १०-०६-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-०८-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-१०-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २०-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. सुनावणी घेतली असल्यास पुन्हा सुनावणी घ्यावी.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण माणिकराव राऊत, डॉ. जुजगर हॉस्पिटलसमोर, डॉ. उरणे यांचा बंगला, शाहुनगर, रजिस्ट्री कार्यालयामागे, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामचंद्र माणिकराव जोगदंड, : अपिलार्थी
विभागीय भांडार शाखा, राज्य परिवहन विभागीय
कार्यशाळा, बार्शी रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन विभागीय
कार्यालय, बसस्थानकाजवळ, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभागीय कार्यालय,
बसस्थानकाजवळ, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामचंद्र माणिकराव जोगदंड | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे प्रतिनिधी - श्री. महादेव देविदास सांगोळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बीड - श्री. बंडे विश्वनाथ व्यंकटराव | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बीड<br>- श्री. रंगनाथ नारायणराव बनसोडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०६-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १२-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०३-०९-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या व्यक्तिगत रजेबाबतची माहिती बारा मुद्दयांवर मागितली आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक ११-०६-२०१० रोजी दिली आहे. अपिलार्थीस मान्य आहे. तथापि त्यांना मुद्दा क्र. ११ शी संबंधित माहिती मिळाली नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. परंतु मुद्दा क्रमांक ११ द्वारे मागणी केलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 8 (1) (j) नुसार देय नाही. अपिलार्थी यांचे त्यांच्या वैद्यकीय रजेबाबत गा-ऱ्हाणे असल्याचे दिसून येत आहे. त्याकरिता त्यांना स्वतंत्र प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. एसटी बोर्ड नियमानुसार जी परिपत्रके, रजा नियमीत करण्याबाबत असतील त्याच्या प्रती अपिलार्थीस देण्यात याव्यात. वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामचंद्र माणिकराव जोगदंड, विभागीय भांडार शाखा, राज्य परिवहन, विभागीय कार्यशाळा, बार्शी रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन विभागीय

कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजाभाऊ नरसिंग शिंदे, : अपिलार्थी
रा. मन्यारवाडी, पो. पिंपळनेर, ता. जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपकार्यकारी अभियंता,
स्थापत्य व सुव्यवस्था विभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
स्थापत्य व सुव्यवस्था विभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | सध्याचे जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता (स्था), म.रा.वि.वि.कं.मर्या.,उस्मानाबाद - श्री. पांडुरंग दत्तात्रय कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता (स्था), म.रा.वि.वि.कं.मर्या.,उस्मानाबाद - श्री. गोपाळ वामन खडीकर | : | उपस्थित |
| ३.४ | सध्याचे जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,उस्मानाबाद - श्री. नितीन रामचंद्र बारगजे | : | उपस्थित |
| ३.५ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, | : | उपस्थित |

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,उस्मानाबाद -
श्री. संजय मनोहर महात्मे

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १७.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ११.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १९.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ११.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. १७.०४.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील सर्व मंजूर कामाबाबत विस्तृत अशी माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली आहे. माहितीचा कालावधी दि. ०१.०४.२००७ ते ३१.०३.२०१० असा आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत असे नमूद केले आहे. तथापि दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांनी सादर केलेले प्रमाणपत्र अवैध असल्याचे दिसून आले. त्यावर सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नव्हती. त्याचप्रमाणे कालावधी सन २००१ ते २००७ असा होता. याबाबत दि. १३.०५.२०१० रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ माधील कलम ७(१) अन्वये विहित कालावधीमध्ये सक्षम अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र द्यावे, असे कळविण्यात आले आहे. तदनंतर दि. ११.०८.२०१० रोजी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता सदरील छायाप्रतीच्या खर्चासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे निधी उपलब्ध नाही, म्हणून कार्यालयीन वेळेत माहितीची पाहणी करावी, असे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. त्यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

आयेगापुढील कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप व कालावधी तसेच कार्यालयीन खर्चाच्या निधीची उपलब्धता विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीची पाहणी उपलब्ध करुन दिली आहे, असे दिसून येत आहे. ही बाब आयोगास अधिनियमातील कलम ७(९)नुसार योग्य वाटते. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजाभाऊ नरसिंग शिंदे, मन्यारवाडी, पो.पिंपळनेर, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (स्था), म.रा.वि.वि.कं.मर्या., उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहन दत्तात्रय गुंड, : अपिलार्थी
रा.केज, ता.केज, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव,
कृषि उत्पन्न बाजार समिती, केज,
जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक निबंधक, सहकारी संस्था केज, जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहन दत्तात्रय गुंड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सांख्यिकी, कृषि उत्पन्न बाजार समिती, केज, जि.बीड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक निबंधक, सहकारी संस्था,केज, जि.बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती, केज, जि.बीडच्या संदर्भात एकूण २७ मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००१ ते २०१० असा विस्तृत आहे. अपिलार्थी यांनी माहितीचा अर्ज कृषि उत्पन्न बाजारसमितीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला. सदरची समिती सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये स्थापन झालेली आहे, असे दिसून येत आहे. या प्रकरणात सहकारी संस्था अधिनियम, सहकारी संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ संदर्भातील उच्च न्यायालयाचे निर्णय तसेच मागितलेल्या माहितीची व्याप्ती इ.बाबी विचारात घेता प्रथम अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था,बीड यांनी सुनावणी घेऊन निर्णय देणे आयोगास आवश्यक वाटते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) नुसार आयोगास दिलेल्या अधिकारानुसार सहायक निबंधक, सहकारी संस्था, बीड श्री. जाधव यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील तरतुदी विचारात घेऊन यथोचित निर्णय पारित करावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१२.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहन दत्तात्रय गुंड, रा. गुंड गल्ली केज, ता.केज, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा सांख्यिकी, कृषि उत्पन्न बाजार समिती, केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,केज,जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बचुटे गौतम लिंबाजी, : अपिलार्थी
रा. साळेगाव, ता. केज., जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपशिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, बीड - श्री. हाशमी सय्यद गौस मोहियोद्दिन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, बीड - श्री. सानप सुखदेव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. २९.०४.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती दि. २०.१०.२०१० रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे. तदनंतर पुन्हा अपिलार्थीस दि. १५.०३.२०१२ रोजी माहिती पाठविण्यात आली आहे. या बाबी कागदपत्रांवरुन दिसून येत आहेत. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील दि. २२.१०.२०१० रोजीचे आहे, तदनंतर त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बचुटे गौतम लिंबाजी मु. पो.साळेगाव, ता. केज, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नवनाथ संपतराव होळकर,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, श्री छत्रपती शाहू प्राथमिक शाळा,<br>शाहूनगर,बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापिका, श्री छत्रपती शाहू प्राथमिक शाळा, शाहूनगर,बीड - सौ. राजूबाई लिंबाण्णा मोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड - श्री. सानप सुखदेव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.१०.२०१०<br>(फेरसादर दि. २९.१०.२०१०) |

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. कारण की, दुसऱ्या एका अर्जाद्वारे ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत. याबाबत त्यांच्याकडे विचारणा करण्यात आली होती. त्यासंदर्भात त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही. या बाबी विचारात घेता अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी पुन्हा एकदा सुनावणी घेऊन निर्णय घ्यावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१७.०६.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नवनाथ संपतराव होळकर, कमल निवास, सारनाथ कॉलनी, पांगरी रोड,शाहूनगर,बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, श्री छत्रपती शाहू प्राथमिक शाळा, शाहूनगर,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. कवडे राहुल नानासाहेब,<br>रा.परळी वै., जि.बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,श्री सरस्वती विद्यालय (मा),<br>परळी वै., जि.बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कवडे राहुल नानासाहेब | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,श्री सरस्वती विद्यालय (मा),परळी वै., जि.बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. यू.एन.जुनाळ, लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. बोरसे देविदास, उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०८.२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४.१०.२०१०

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली सर्व माहिती त्यांना देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली आहे, असे सुनावणीमध्ये आयोगासमोर प्रतिपादन केले. या सर्व बाबी पाहता, प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २८-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कवडे राहुल नानासाहेब,द्वारा श्री.एन.डी.कवडे, ७-क, विद्यानगर,परळी वै.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री सरस्वती विद्यालय (मा), परळी वै., जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नायबळ राम ग्यानबा,<br>रा.माजलगाव, जि.बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक,<br>वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (मा.), शिक्षण विभाग, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, वेतन पथक (मा.), बीड - श्री. अनंत मुरलीधरराव दाणी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. बोरसे देविदास, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८.११.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (मा.), शिक्षण विभाग, बीड यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे भविष्य निर्वाह निधी बीडी क्र.३६६ या खात्यावर जमा असलेल्या रक्कम व व्याजाबाबत सन २००० ते मार्च २००८ या कालावधीची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांच्या विभागातील कार्यपध्दतीची माहिती अवगत करुन देताना कथन केले की, अपिलार्थी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या एका खाजगी अनुदानित शाळेमध्ये शिक्षक आहेत व या संस्थेच्या औरंगाबाद येथील शाळेमध्ये त्यांची बीड येथून बदली झाली होती. शासनाच्या नियमानुसार ज्या जिल्हयामध्ये शिक्षक कार्यरत असतील, त्या शाळेच्या मुख्याध्यापकाच्या मदतीने भविष्य निर्वाह निधी खाते सुरु करुन भविष्य निर्वाह निधीची रक्कम जमा करावयाची असते. या बाबतच्या लेखाविषयक बाबी,अभिलेखे/हिशोब संबंधित जिल्हयाच्या जिल्हा परिषदेअंतर्गत जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (मा.), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद यांच्याकडे ठेवण्यात येत असतो. एखाद्या शिक्षकाची संस्थेअंतर्गत इतरत्र दुसऱ्या जिल्हयातील शाळेमध्ये बदली झाल्यास त्या परिक्षेत्रातील वेतन पथकाकडे संबंधित मुख्याध्यापकाच्या मदतीने नवीन खाते सुरु करुन जुने भविष्य निर्वाह निधी खात्यातील जमा रक्कम स्थलांतरित (transfer) केली जाते. याप्रमाणे अपिलार्थी श्री. नायबळ राम ग्यानबा यांची जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (मा.), शिक्षण विभाग, बीड यांच्या कार्यालयाशी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना खालील माहिती हवी आहे, असे नमूद केलेले आहे.

१) भविष्य निर्वाह निधी खाते क्र. बीडी ३६६ या खात्यावरील जमा रक्कम, सन २००१-०२, २००२-०३,२००७-०८, २००८-०९ या वर्षांची स्लीप देण्यात आली आहे. उर्वरित कालावधीची स्लीप देण्यात आलेली नाही.

२) जन माहिती अधिकारी यांनी प्रत्येक वर्षीचा खाते उतारा व जमा रकमेचा तपशील न देता २००१-१० पर्यंतच्या जमा रकमेच्या स्लिपस्पैकी चारच स्लिपस् दिल्या आहेत.

वरील बाबींवर जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यांच्या बीड येथील कार्यकाळातील खातेउताऱ्याची माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. उर्वरित कालावधीमध्ये अपिलार्थी यांची जिल्हयाबाहेर औरंगाबाद येथील शाळेमध्ये बदली झाली असल्यामुळे त्यांच्या या

कालावधीचे अपिलार्थी यांचे भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा वर्गणीबाबतची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही.

भविष्य निर्वाह निधीची रक्कम सर्वसाधारणपणे प्रत्येक शिक्षकाच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये प्रतिमाह जमा होत असते. या शिक्षकांच्या दरमहा जमा होणाऱ्या भ.नि.नि.वर्गणीची नोंद रजिस्टरला घेतलेली असते, असे आयोगाचे मत आहे. यामुळे सदरील रजिस्टरमध्ये अपिलार्थीच्या भ.नि.नि.वर्गणीची नोंद ज्या पृष्ठावर असेल, त्या पृष्ठांची छायाप्रत अपिलार्थीस देणे योग्य राहील, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन पथक (मा.),जि.प.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या भविष्य निर्वाह निधीसंदर्भात त्यांच्या बीड येथील कार्यकाळासंबंधित वर्ष २००१-२०१० या कालावधीतील रजिस्टरमधील नोंदी ज्या पृष्ठांवर असतील, त्या पृष्ठांच्या छायांकित प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नायबळ राम ग्यानबा,द्वारा श्री. अर्जून मनोहरराव होके, गजाननननगर, माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन पथक (मा.), जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. धपाटे अरुण नानासाहेब, : अपिलार्थी
रा.भाटुंबा, ता. केज, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यालयीन अधीक्षक,
बांधकाम विभाग क्र.२, जि.प.बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग क्र.२, जि.प.बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६९२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. धपाटे अरुण नानासाहेब | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालयीन अधीक्षक, जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.२, बीड - श्रीमती पी.जी.गायकवाड | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.२, बीड- श्री. पी.एम.चंदनशिव | : उपस्थित |
| ३.४ | श्रीमती वैशाली सासवडे, शाखा अभियंता, पं.स.वडवणी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०४.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.०७.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९.१०.२०१०

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. आयोगापुढील युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी जिल्हा परिषद माध्यमिक शाळेमध्ये २००५-०६ मध्ये झालेल्या शाळा दुरुस्तीचे इस्टीमेट, टेंडर, वर्कऑर्डरची सत्यप्रत, शाळादुरुस्ती करण्यात आलेल्या योजनेची माहिती इ.माहिती मागितली आहे. या संदर्भात अपिलार्थीस मोजमापपुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती देण्यात आल्या आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अंदाजपत्रकाच्या प्रती, कार्यारंभ आदेशाच्या प्रती, तसेच प्रशासकीय मान्यतेच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणल्या असल्याचे दिसून येत आहे. आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस समक्ष देण्यात आल्या. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सदर कामाच्या निविदेच्या प्रती मागितल्या आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.२, बीड यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, शोध घेऊनही निविदेच्या प्रती प्राप्त होत नाहीत. सबब संदर्भित निविदेच्या प्रतींचा पुन्हा एकदा शोध घेण्यात यावा व अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्यात याव्यात. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.२, बीड यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी निविदेच्या प्रतींचा पुन्हा एकदा शोध घ्यावा व जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण नानासाहेब धपाटे,रा. भाटुंबा, ता.केज, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,जिल्हा परिषद, बांधकाम विभाग क्र,२,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.२, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नरवणे सुरेश वैजीनाथ,<br>रा. बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उपअधीक्षक,<br>भूमी अभिलेख, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नरवणे सुरेश वैजीनाथ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधीक्षक, भूमी अभिलेख, बीड- श्रीमती एस.यु.सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. डी.बी.पोतदार,प्रमुख लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची संचिका जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सापडत नव्हती. त्या संचिकेचा शोध घेण्यात आला. ती संचिका आता प्राप्त झाली असून अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची एकूण ३६ पृष्ठे दि. २६.०३.२०१२ रोजी अपिलार्थीस विनामूल्य देण्यात आलेली आहेत. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली. या सर्व बाबी विचारात घेता अपील प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नरवणे सुरेश वैजीनाथ, रा.मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वैजनाथ नारायणराव माने, : अपिलार्थी
रा. परळी वै. जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वैद्यकीय अधीक्षक,
उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय, परळी वै.
जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा रुग्णालय, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. वैजनाथ नारायणराव माने | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालयीन अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, परळी वै.,जि.बीड - श्री. पी.एन.पल्लेवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य प्रशासकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय,बीड- श्री. एम.एस.बोटले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.११.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील कागदपत्रांवरुन, अपिलार्थी यांनी दि. ०५.०५.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये दोन मुद्यांवर मागितलेली माहिती व त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती या संदर्भात खालील बाबी दिसून येत आहेत.

१) मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे.माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार प्रश्नार्थक माहिती देय होत नाही. तथापि केव्हापासून दक्षता कक्ष बंद आहे, हे अपिलार्थीस दि. २९.०७.२०१० रोजी कळविण्यात आले आहे. या संदर्भात कार्यालय प्रमुखांकडून वेगवेगळया तारखा देण्यात आल्याचे दिसून येत आहे.

२) मुद्दा क्र. २ मध्ये त्रयस्थ डॉ.महेंद्र सोनवणे हे किती दिवसांपासून कार्यरत आहेत, त्यांनी किती रुग्णांना सेवा दिली, यांची संख्या ओपीडी केसनंबरसह माहिती मागितली आहे. डॉ. सोनवणे यांच्या कार्यकाळाचा तपशील मागितलेला आहे.त्यासंदर्भात दि. २९.०७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. तसेच त्यांनी केलेल्या बाहयरुग्णसेवेची संख्या मागितली आहे ही माहिती मोघम स्वरुपाची आहे.

यासंदर्भात आयोगास असे कथन करण्यात आले आहे की, प्रतिदिन सुमारे २०० बाहयरुग्ण जन माहिती अधिकारी यांच्या रुग्णालयात येतात व त्यांच्या रुग्णालयात ३-४ वेगवेगळे वैद्यकीय अधिकारी तपासणी करतात. प्रत्येक वैद्यकीय अधिकाऱ्यांचा बाहयरुग्ण सेवेचा वेगळा तपशील ठेवण्यात आलेला नाही. सदर मागितलेली माहिती आयोगास व्यवहार्य वाटत नाही. नेमक्या स्वरुपाची माहिती मागितली असल्यास देणे शक्य होते.

या सर्व बाबी विचारात घेता उपरोक्त मुद्दा क्र.१ संदर्भात देय होत असलेली अपिलार्थीने त्यांचा माहितीचा अर्ज केलेल्या दिनांकापासून म्हणजे ०५.०५.२०१० पासून दक्षता कक्ष बंद होते किंवा कसे, ही बाब अपिलार्थीस अंतिमतः कळविण्यात यावी व सदर दक्षता कक्ष बंद असल्याबाबत त्यांच्या कार्यालयाकडून काही पत्रव्यवहार केला असल्यास अथवा त्यासंदर्भात टिपणीच्या स्वरुपात अहवाल असल्यास ती कागदपत्रे अपिलार्थीस देण्यात यावीत. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, परळी वै.,जि.बीड यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वैजनाथ नारायणराव माने,श्री संत सावता माळी चौक, परळी वै.,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, परळी वै.,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पांडुरंग आश्रुबा काळे, : अपिलार्थी
रा. पिंपरी (बु.), ता.परळी वै.,
जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,पिंपरी (बु.),
ता.परळी वै.,जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, परळी वै.,जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पांडुरंग आश्रुबा काळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,पिंपरी (बु.),ता.परळी वै.,जि.बीड - श्रीमती. जाधव ए.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, परळी वै.,जि.बीड - रोडेवार आर.एच. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०८.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२.११.२०१०

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,पिंपरी (बु.),ता.परळी वै.,जि.बीड यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्या या पदावर ऑगस्ट,११ पासून कार्यरत आहेत.पूर्वीच्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे, हे समजू शकले नाही. म्हणून कागदपत्रे उपलब्ध होताच अपिलार्थी यांनी मागितलेल्या संपूर्ण माहितीचे एकूण २५० पृष्ठे सोबत आणली आहेत. आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस विनामूल्य देण्यात आली. अपिलार्थी यांनी ही माहिती स्वीकारली.

या प्रकरणी असे दिसून येत आहे की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही.सध्याच्या जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,पिंपरी (बु.),ता.परळी वै.,जि.बीड यांनी स्वतःच्या खर्चाने माहितीच्या झेरॉक्स प्रती काढून अपिलार्थीस दिलेल्या आहेत. या सर्व बाबी पाहता, झेरॉक्स प्रतींसाठी झालेल्या खर्चाची संपूर्ण रक्कम संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडून वसूल करुन सध्याच्या जन माहिती अधिकारी यांना त्यांनी या माहितीसाठी व्यक्तिशः खर्च केल्यामुळे त्यांच्याकडे वर्ग करण्यात यावी व ही बाब कार्यालय प्रमुख म्हणून गट विकास अधिकारी, पंचायत समिती,परळी वै.,जि.बीड यांनी पहावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वै, जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २८-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग आश्रुबा काळे,रा. पिंपरी (बु.), ता.परळी वै.,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,पिंपरी (बु.),ता.परळी वै.,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं),पंचायत समिती, परळी वै., जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती,परळी वै,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जयंत सुखदेवराव शिनगारे,<br>मु. पो. किल्ले धारुर (कसबा विभाग), पश्चिम शिनगारे गल्ली, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६९६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड<br>- श्री. एम. एन. गायकवाड | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड<br>- डॉ. शिवदास झेड. शिरसाठ | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०३-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६-१०-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २८-०७-२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारुर, जिल्हा बीड मार्फत राष्ट्रीय सेवा योजना शिबिर या कार्यक्रमाबाबत सन २००७-०८, २००८-०९, व २००९-२०१० अशी चार वर्षाची एकूण सात मुद्दयांवर माहिती मागितली होती. सदरचा माहिती अर्ज आवश्यक ते मुद्रांक चिकटविले नसल्यामुळे अपिलार्थी यांनी तो मागे घेतला व त्यानुसार पुनश्च: दिनांक १३-०८-२०१० रोजी माहितीचा अर्ज सादर केला. मागितलेली माहिती तीच आहे. अपिलार्थी यांना या माहितीच्या अर्जावर दिनांक २५-०८-२०१० रोजी प्रथम प्रतिसाद देण्यात आला. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारुर, जिल्हा बीड यांच्याकडे दिनांक ०३-०९-२०१० चे प्रथम अपील सादर केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १०-१०-२०१० रोजी निर्णय दिला.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांचे दिनांक ०४-१२-२०१० चे पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, दिनांक ०८-११-२०१० अन्वये अपील अर्ज दाखल केलेला आहे. सदरची अपूर्ण माहिती महाविद्यालयाकडून पूर्ण करुन दिल्यामुळे त्यांचे समाधान झाले आहे. यास्तव अपील अर्ज मागे घेण्यात येत आहे. तो रद्द करण्यात यावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जयंत सुखदेवराव शिनगारे, मु. पो. किल्ले धारुर (कसबा विभाग), पश्चिम शिनगारे गल्ली, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. शशिकला अर्जुन दळवी, : अपिलार्थी
मु. केळ-पिंपळगांव, पो. दौलावडगांव, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
संलग्न सहायक निबंधक, सहकारी संस्था, आष्टी,
जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था, आष्टी, जिल्हा बीड<br>- श्री. ससाने एस. पी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन), बीड<br>- श्री. ए. एस. कदम | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड<br>- श्री. बी. एस. जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०६-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०२-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १७-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व तत्कालीन आणि सध्याचे जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये श्रीधर गुंड बिगरशेती ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्यादित, धानोरा, तालुका आष्टी, जिल्हा बीड बाबत माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) नुसार जी माहिती, माहिती या व्याख्येत येते व जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे ती सर्व माहिती अपिलार्थीस दिनांक ०२-०७-२०१० रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत देण्यात आली आहे. तदनंतर अपिलार्थी यांच्या दिनांक १७-०७-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांची प्रथम अपिलावर सुनावणी झाल्यानंतर देण्यात आली आहे. या सर्व बाबी आयोगास कागदपत्रावरुन आढळून येत आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०४-११-२०१० च्या व्दितीय अपिलामध्ये (तीन मुद्यावर) माहिती मिळाली नाही असे नमूद केले आहे. तथापि या तीनही मुद्दयाबाबत जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे ती देण्यात आली आहे असे कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. शशिकला अर्जुन दळवी, मु. केळ-पिंपळगांव, पो. दौलावडगांव, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन), बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जवकर सुभाष दामोधरराव, : अपिलार्थी
राम मंदिराजवळ, कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६९८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जवकर सुभाष दामोधरराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड - श्री. खान एम. आय. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड - श्री. पवार वि. वि. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २२-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०३-२००९<br>फेरसादर दिनांक<br>१६-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १५-१२-२००८ च्या माहिती अर्जान्वये सन १९९२-९३-९४ साठी लघुपाटबंधारे उपविभाग, गेवराई अंतर्गत कायम नळयोजना शहाजानपुर, तालुका माजलगांव येथे वापरात असलेल्या मोजमाप पुस्तिका क्रमांक ४६२८ पान क्रमांक ६७ ची साक्षांकीत प्रत मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात शोध घेण्यात आला तथापि ती उपलब्ध झालेली नाही. नोंदीवरुन असे आढळून आले आहे की, संबंधित कनिष्ठ अभियंता श्री. मकदुल हुसेन यांना सदरची मोजमाप पुस्तिका कार्यालयात सादर करण्याकरिता दिनांक ०५-०३-२००९ ला कळविण्यात आले. आतापर्यंत त्यांनी संचिका दिलेली नाही. संबंधित कनिष्ठ अभियंता यांना दिनांक २६-०३-२०१२ रोजी पुनश्चः स्मरणपत्र देण्यात आलेले आहे असे जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी आयोगास कथन केले. मोजमाप पुस्तिका हे कायमचे रेकॉर्ड आहे व संबंधित कनिष्ठ अभियंता हे निवृत्त झालेले आहेत. त्यापूर्वीच त्यांनी असे कायमस्वरुपी रेकॉर्ड कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे तथापि त्यांनी असे केलेले नाही. याकरिता संबंधित कनिष्ठ अभियंता, यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याकरिता सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) नुसार शिफारस करण्यात येत आहे. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी कार्यालय प्रमुख या नात्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत विनामूल्य उपलब्ध होईल अथवा माहिती उपलब्ध न झाल्यास अपिलार्थीस तसे स्पष्टपणे कळविण्यात येईल, असे व्यक्तिशः पहावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

१. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी कार्यवाही करतील, असे पहावे.

२. सचिव, ग्रामविकास विभाग यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे विभागीय चौकशी करण्याची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २९-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जवकर सुभाष दामोधरराव, राम मंदिराजवळ, कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, (ग्रामविकास विभाग), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रमेश एकनाथराव काळे, : अपिलार्थी
शिवनेरी निवास, तेलगांव रोड, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
श्री पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्राचार्य, श्री पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य लिपिक, श्री. पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड<br>- श्री. ज्ञानेश्वर भिमराव साबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, श्री. पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०७-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-०९-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०-१०-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१-११-२००८ रोजीचे व्दितीय अपील दिनांक २२-१२-२००८ रोजी आयोगाकडे दाखल केले होते. या अपिलावर दिनांक १७-१२-२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की, अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या प्रथम अर्जाच्या प्रतीवर अपिलार्थीची स्वाक्षरी नव्हती. तसेच या अर्जावर अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक असलेल्या १० रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प डकवले नव्हते. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर देखील अपिलार्थीने २० रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प डकवले नसल्याचे पुढील तपासणीस आयोगास आढळून आले. त्यामुळे अपिलार्थीने दाखल केलेले व्दितीय अपील अवैध ठरत असल्याने व त्यावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून न आल्याने अपिलार्थीचे दिनांक २२-१२-२००८ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आयोगाने फेटाळले. अपिलार्थी यांनी या विरुध्द मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये रिट याचिका दाखल केली. यानंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपिलामध्ये असलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासंदर्भात रिट याचिका परत घेण्याची न्यायालयास परवानगी मागितली. यानंतर सर्व बाबींची पूर्तता करुन दिनांक ३०-१०-२०१० रोजी प्रथम अपील सादर केले.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी, श्री पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांच्याकडे केलेला आहे. तसेच प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, श्री पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांच्याकडे केलेले आहे. सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या दिनांक १५-११-२०१० च्या व्दितीय अपिलामध्ये त्यांचे प्रथम अपील स्विकारले नाही असे नमूद केले आहे. कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ३०-१०-२०१० च्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारीत केल्याचे दिसून येत नाही.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) च्या प्राप्त अधिकारान्वये अपिलार्थीच्या दिनांक ३०-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्याकरिता सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून आयोगातर्फे निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम

अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा. याकरिता अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेश एकनाथराव काळे, शिवनेरी निवास, तेलगांव रोड, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, श्री. पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. कोल्हे रामप्रसाद सुंदरराव,<br>व्दारा, चिंतामणी मल्टी सर्व्हिसेस, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, नगर रोड, बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>समाजकल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कोल्हे रामप्रसाद सुंदरराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड<br>- श्री. एम. जी. राठ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

१. नवजीवन अस्थिव्यंग निवासी विद्यालय, गढी व आदर्श मतिमंद निवासी विद्यालय, गढी, तालुका जिल्हा बीड या शाळेच्या स्थलांतरण प्रस्तावाची प्रत व मान्यता आदेशाची प्रमाणित प्रत.

२. वेळोवेळी करण्यात आलेल्या तपासण्या, चौकशी, शाळेची मान्यता (अनुज्ञाप्ती), अनुदान, स्थलांतरण याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या शिफारसी, सूचना, आदेश प्रमाणित प्रती.

३. नवजीवन अस्थिव्यंग निवासी विद्यालय, गढी येथील गैरप्रकाराबाबत दिनांक १२-०४-२०१० रोजी प्रसिध्द बातमी व त्याबाबत दिनांक २४-०६-२०१० रोजी प्राप्त तक्रारीवरील कार्यवाहीचा स्वयंस्पष्ट अहवाल.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही असे आयोगास कथन केले.

वरील मुद्दा क्रमांक १ मधील स्थलांतरणाच्या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध आहे ती आज रोजी अपिलार्थीस देण्यात आली. त्यातील जो प्रस्ताव स्थलांतरणाचा पाठविला त्याची प्रत अपिलार्थीस देय होत आहे. ती कार्यालयात शोधण्यात यावी तसेच आयुक्त कार्यालयाकडून एक विशेष बाब म्हणून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस द्यावी.

२. मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात २००३ सालापासूनची सर्व माहिती देण्यात यावी अशी त्यांनी स्वेच्छेने माहितीची व्याप्ती कमी करुन विनंती केली.

३. सर्वसाधारण शाळेच्या संदर्भातील तपासणीची प्रत. या २००३ ते अर्ज केलेल्या तारखेपर्यंत आलेल्या तक्रारीच्या प्रती व केलेल्या कार्यवाहीच्या प्रती.

४. नवजीवन अस्थिव्यंग निवासी विद्यालय, गढी व आदर्श मतिमंद निवासी विद्यालय, गढी, तालुका जिल्हा बीड येथील गैरप्रकाराबाबत केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीचा अहवाल.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांना वर नमूद केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे असे दिसून येत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीअन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या छायांकित प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीस वर नमूद केलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कोल्हे रामप्रसाद सुंदरराव, व्दारा, चिंतामणी मल्टी सर्व्हिसेस, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, नगर रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. कणसे अशोक विष्णु, | : | अपिलार्थी |
| | मु. पो. सोनेसांगवी, तालुका केज, जिल्हा बीड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय-१), पोलीस आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय-१), पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय-१), पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई - श्री. टी. अे. घोबळे | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय-१), पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २६-०७-२०१० च्या माहिती अर्जान्वये पोलीस भरती प्रक्रियेसंदर्भात एकूण पाच मुद्दयांवर माहिती मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. तसेच त्याच माहितीच्या अर्जावर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, मुंबई यांच्याकडे दिनांक ३०-११-२०१० रोजी व्दितीय अपील सादर केले आहे. यावर राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढण्याचा निर्णय दिनांक २८-०३-२०११ रोजी घेतलेला आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या या व्दितीय अपिलावर पुन्हा सुनावणी घेण्याची आवश्यकता नसावी.

आयोगापुढील कागदपत्रावरुन वरील बाबी दिसून येत आहेत व त्यामुळे अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२०१० रोजी केलेले व्दितीय अपील निष्प्रभ ठरत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कणसे अशोक विष्णु, मु. पो. सोनेसांगवी, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय-१), पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय-१), पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक महादेवआप्पा सवादे, : अपिलार्थी
रा. केसापुरी, पो. फुलेपिंपळगांव, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, केसापुरी,
पो. फुलेपिंपळगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अशोक महादेवआप्पा सवादे | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील श्री. देशमुख बी. पी. | | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, केसापुरी,<br>पो. फुलेपिंपळगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड<br>- श्री. एस. बी. लेंडाळ | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड - श्री. मोरे ए. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | प्रत जोडलेली नाही |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | प्रत जोडलेली नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, अपिलार्थी यांचे वकील, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १८-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक महादेवआप्पा सवादे, रा. केसापुरी, पो. फुलेपिंपळगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, केसापुरी, पो. फुलेपिंपळगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चव्हाण त्रिंबक सोपानराव, : अपिलार्थी
मु. पो. जातेगांव, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जातेगांव,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७०३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जातेगांव, तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. वाघमारे गौतम गणपतराव | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. पी. एस. तांदळे, विस्तार अधिकारी (पंचायत) | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२-०८-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६-१०-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दिनांक २८-०६-२०१० रोजीच्या माहिती अर्जाव्दारे ग्रामपंचायत कार्यालय जातेगांव, तालुका गेवराई, जिल्हा बीड अंतर्गत कामांविषयीची एकूण दहा मुद्दयांव्दारे माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपलावरील सुनावणीनंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहितीची पाहणी दिली आहे. यासंदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक २९-११-२०१० रोजीच्या पत्राव्दारे अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, गेवराई, जिल्हा बीड यांना असे कळविले आहे की, त्यांनी प्रत्यक्षात सर्व माहिती बघितली आहे. त्यांच्या अर्जाप्रमाणे त्यांना माहिती प्राप्त झाली आहे. तसेच असेही नमूद केले आहे की, त्यांचा अर्ज निकाली काढण्यात यावा व याबाबत त्यांची कसलीही तक्रार नाही. ही बाब विचारात घेता अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चव्हाण त्रिंबक सोपानराव, मु. पो. जातेगांव, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जातेगांव, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,

गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सोपानराव गंगारामजी शिंदे,<br>मु. पो. दिंद्रुड, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, माजलगांव, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, भूमि अभिलेख कार्यालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सोपानराव गंगारामजी शिंदे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक भूमि अभिलेख, माजलगांव, जिल्हा बीड<br>- श्री. एस. एन. शेवाळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. डी. बी. पोतदार, प्रमुख लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१-०८-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहिती अर्जासंदर्भात आयोगापुढे निवेदन सादर करण्याकरिता कालावधी मागवून घेतला. तो मान्य करुन अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक १२-०६-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोपानराव गंगारामजी शिंदे, मु. पो. दिंद्रुड, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक भूमि अभिलेख, माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोळंके धनंजय (पापा), : अपिलार्थी
भक्ती मंगल सेवा केंद्र, शिवाजी चौक, माजलगांव,
तालुका माजलगांव जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग
कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग<br>कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८-०९-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १८-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोळंके धनंजय (पापा), भक्ती मंगल सेवा केंद्र, शिवाजी चौक, माजलगांव, तालुका माजलगांव जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भाऊसाहेब बाबुराव गर्जे, : अपिलार्थी
रा.कापसी, पो. डोईठाण,
ता. आष्टी, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय,कापसी, ता.आष्टी,
जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, आष्टी,जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भाऊसाहेब बाबुराव गर्जे | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील ॲड. व्ही.एम.चाटे | : | उपस्थित |
| ३.३ | सध्याचे जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,कापसी, ता.आष्टी,जि.बीड - श्री. व्ही.डी.लटपटे | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,कापसी, ता.आष्टी,जि.बीड -श्री. शहीर बी.पी. | : | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, आष्टी,जि.बीड - श्री. शिंदे ए.टी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.११.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.११.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांच्यातर्फे त्यांचे वकील यांनी युक्तिवादाद्वारे कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ०४.०९.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये खालील मुद्यांवर माहिती मागितली आहे.

१) सन २००५ ते दि.०४.०९.२०१० पर्यंत कापसी ग्रामपंचायतला प्राप्त झालेले अनुदान

२) मिळालेले अनुदान कोणत्या बाबीवर खर्च केले, त्याची माहिती.

३) ग्रामपंचायतने आतापर्यंत केलेल्या खरेदी संदर्भात पावत्याच्या छायाप्रती.

४) ग्रामपंचायतच्या ठरावाने मान्यता घेतलेल्या ठरावाच्या प्रती.

५) मासिक सभा व ग्रामसभा कोणत्या तारखेला किती घ्याव्यात व किती घेतल्या याची सविस्तर माहिती.

६) सन २००५ सालापासूनचा १२ वा वित्त आयोग ग्रामपंचायतचा कशावर खर्च केला त्याचे सविस्तर विवरण

अपिलार्थी यांनी सन २००५ ते दि. ०४.०९.२०१० पर्यंत अशी सुमारे सहा वर्षांची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना उशिराने दि. २०.११.२०१० रोजी माहिती प्राप्त झालेली आहे. त्यांना मिळालेली माहिती एका वर्षाची आहे. उर्वरित चार वर्षांची माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, आष्टी,जि.बीड यांनी सुनावणी घेऊन दि. ११.११.२०१० रोजी सात दिवसांच्या आत माहिती देण्याचा निर्णय दिलेला आहे. त्यानंतरही विलंबाने माहिती मिळालेली आहे. तरी जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना दि. १५.११.२०१० रोजी माहिती तयार असून ती व्यक्तिशः देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारण्यासाठी प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे दि. २०.११.२०१० रोजी पोस्टाद्वारे माहितीची ६१ पृष्ठे पाठविण्यात आलेली आहेत. जन माहिती अधिकारी यांनी एका वर्षाची माहिती पाठविली आहे. उर्वरित माहिती उपलब्ध झाली नाही, असे त्यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी एकूण ६ वर्षांची ६ मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितलेली आहे. माहिती संकलीत करुन अपिलार्थीस दि. २०.११.२०१० रोजी देण्यात आली आहे. यामध्ये सुमारे ४२ दिवसांचा विलंब

झालेला आहे. त्याचप्रमाणे उर्वरित ५ वर्षांची माहिती उपलब्ध नसल्याने देऊ शकलेले नाहीत. या माहितीचा शोध घेऊन तसेच पूर्वीच्या ग्रामसेवकाकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलार्थीस माहिती द्यावी लागेल. ही बाब कार्यालय प्रमुख म्हणून गट विकास अधिकारी,पंचायत समिती, आष्टी, जि.बीड यांनी पहावी, असे अधिनियमातील कलम 19(8)(a) मधील तरतुदीनुसार आयोग जबाबदारी निश्चित करीत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांना भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी, जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,कापसी, ता.आष्टी,जि.बीड हे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवतील याची दक्षता घ्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भाऊसाहेब बाबुराव गर्जे,रा.कापसी, पो. डोईठाण,ता. आष्टी, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,कापसी, ता.आष्टी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, आष्टी,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महादेव आजिनाथ लटपटे, : अपिलार्थी
मु. पो. मुर्शदपूर औदुंबरनगर,ता.आष्टी, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, आष्टी, जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा निबंधक, सहकारी संस्था,बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक निबंधक, सहकारी संस्था,आष्टी,जि. बीड - श्री. ससाणे एस.पी. | : | उपस्थित |
| ३.३ | (सध्याचे)जन अपिलीय अधिकारी - सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था,बीड-श्री. ए.एस.कदम | : | उपस्थित |
| ३.४ | (तत्कालीन)जन अपिलीय अधिकारी - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,बीड-श्री. बी.एस.जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.१०.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०.११.२०१०

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, सध्याचे व तत्कालीन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,आष्टी,जि.बीड यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. २२.०७.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये दि. ०१.०१.२०१० ते २२.०७.२०१० पर्यंत आष्टी तालुक्यामध्ये नोंदणी झालेल्या सर्व सहकारी संस्थासंदर्भातील संचिकेच्या प्रमाणित प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्यामुळे व अपिलार्थी यांनी मागितलेल्या त्यांच्या कार्यालयातील संचिकांची संख्या एकूण ५२ असून त्याची एकूण ४९५० एवढी पृष्ठे आहेत. तथापि त्याकरिता त्यांच्या कार्यालयात छायाप्रती काढण्याकरिता निधी उपलब्ध नसल्यामुळे दि. २०.०८.२०१० रोजी कार्यालयीन वेळेमध्ये माहिती/संचिका पाहणीसाठी उपलब्ध असल्याचे अपिलार्थीस दि. २९.०७.२०१० रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात तीन वेळा सुनावणी घेण्यात आली. दि. २०.१०.२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. अपिलार्थीच्या अर्जाप्रमाणे अपिलार्थी यांना त्यांच्या कार्यालयातील जबाबदार कर्मचाऱ्यासोबत झेरॉक्स करुन प्रमाणित प्रती अपिलार्थीस देण्यात याव्यात असा जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला. अपिलार्थी यांना माहिती घेऊन जाण्याकरिता दि. २१.११.२०१० रोजी स्मरणपत्र दिले. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही व दि. १७.०३.२०११ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,आष्टी,जि.बीड यांना पत्राद्वारे कळविले आहे की, आर्थिक अडचण असल्यामुळे सदरची माहिती घेण्याचे रद्द करीत आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत. मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठी आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहितीची पाहणी दिलेली आहे, जी योग्य आहे. अपिलार्थी यांनी झेरॉक्स काढण्याकरिता तयारी नसल्याने माघार घेतली आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस एक दिवस निश्चित करुन नोंदणीकृत टपालाद्वारे कळवून अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन देणे उचित राहील, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. अशी अभिलेखांची पाहणी अपिलार्थीस अनुज्ञेय राहील. त्यांच्या प्रतिनिधीस अनुज्ञेय राहणार नाही, या बाबीची अपिलार्थी यांनी नोंद घ्यावी.

माहिती अधिकार अधिनियमातील कलम 2(j) मध्ये माहितीच्या अधिकाराचा तपशील दिलेला आहे. यामध्ये प्रथम पर्याय माहितीची पाहणी देण्याचा आहे. माहितीची पाहणी देणे म्हणजे माहिती देणे असे होते.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, आष्टी, जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादेव आजिनाथ लटपटे, रा.मुर्शदपूर औदुंबरनगर, ता. आष्टी,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,आष्टी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अशोक फकिरराव कदम,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,येळंब (घाट),ता.जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,येळंब (घाट),ता.जि.बीड - श्री. गायकवाड बी.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बीड - श्री. जाधव यु.ए. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.१०.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. या बाबीची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी, असे आयोगाचे निदेश आहेत. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १३.०६.२०१२ रोजी सकाळी ११.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक फकिरराव कदम,रा. श्री.शेळके तलाठी यांचे बाजूला, पोस्टमन कॉलनी, पांगरी रोड, बीड, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,येळंब (घाट),ता.जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जाधव अशोक हरिदास,<br>रा.नांदुरघाट, ता.केज,जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जाधव अशोक हरिदास | : | उपस्थित |
| ३.२ | सहशिक्षक, संत श्री आसारामजी बापू माध्यमिक विद्यालय,नांदूरघाट,जि.बीड | | |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड - श्री. देविदास बोरसे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व संत श्री. आसारामजी बाजू माध्यमिक विद्यालय, नांदूरघाट येथील सहशिक्षक उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी श्री.अशोक हरिदास जाधव, रा. केज हे संत श्री आसारामजी बापू माध्यमिक विद्यालय,नांदूरघाट,जि.बीड येथे कार्यरत होते. त्यांना निलंबित करुन नंतर बडतर्फ करण्यात आले. याबाबत त्यांनी एकूण चार मुद्यांवर जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (मा.),जि.प.बीड यांच्याकडून माहिती मागितली आहे. या माहितीकरिता माहितीचा अर्ज संबंधित मुख्याध्यापकाकडे वर्ग करण्यात आला आहे. अपिलार्थी यांना आतापर्यंत माहिती मिळालेली नाही. आयोगाने विचारणा केली असता मुद्दा क्र. २ व ३ बाबतच्या माहितीच्या प्रती अपिलार्थीस आयोगाचे सूचनेनुसार देण्यात आल्या. अपिलार्थी यांनी त्या स्वीकारल्या. मुद्दा क्र. १ व ४ ची माहिती उपशिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद,बीड यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे. ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य द्यावी. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड यांनी त्यांचे अधिपत्त्याखालील सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडे भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जासंदर्भात अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत प्रतिसाद देण्याच्या सूचना परिपत्रकाद्वारे निर्गमित कराव्यात. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ व ४ ची माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद,बीड यांनी त्यांचे अधिपत्त्याखालील सर्व जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडे भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जासंदर्भात अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत प्रतिसाद देण्याच्या सूचना परिपत्रकाद्वारे निर्गमित कराव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाधव अशोक हरिदास, रा. नांदूरघाट, ता.केज, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लाड नवनाथ भानुदास,<br>रा.अंबाजोगाई, जि.बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी,<br>स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय<br>महाविद्यालय,अंबाजोगाई, जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिष्ठाता,स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय,<br>अंबाजोगाई, जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासकीय अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय,अंबाजोगाई, जि.बीड- श्री. देवराव संभाजी भोकरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधिष्ठाता,स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय,अंबाजोगाई, जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |

(फेरसादर दि. ०६.१२.२०१०)

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २८.०१.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाअंतर्गत विविध समित्या, यंत्रसामुग्री इत्यादीबाबत माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दि.०१.०१.२००४ ते दि.२८.०१.२०१० व दि. ०१.०१.१९९५ ते २८.०१.२०१० असा नमूद केलेला आहे. माहिती एकंदर दहा मुद्यांवर आहे. त्यामध्ये मुद्दा क्र. ४ व ८ मध्ये तक्ता नमूद करुन तक्त्यामध्ये माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांचा हा माहितीचा अर्ज दि. ०३.०२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला. त्यावर कलम ७(१) नुसार दि. ०१.०३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद देऊन खालीलप्रमाणे कळविले आहे.

"संदर्भिय अर्जान्वये या विभागाशी संबंधित मुद्दा क्र.८ बाबतची माहिती आपणास पुरविण्यात येत आहे तसेच निवासस्थान वाटप कमिटी अंतर्गत वर्ग १ ते ४ कर्मचाऱ्यांसाठी संपूर्ण निवासस्थान वाटप वर्गवारीप्रमाणे केलेली आहे. सदरील कर्मचाऱ्यांकडे कसलीही बाकी नाही तरी सर्व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानापोटीची बाकी निरंक समजण्यात यावी.

तसेच अर्जातील मुद्दा क्र. १० अन्वये अर्जदाराने सन १.०१.२००४ ते २८.०१.२०१० या कालावधीत सामाजिक कार्यकर्ते व इतर व्यक्ती यांनी दाखल केलेल्या तक्रारी व भ्रष्टाचारासंबंधी मागितलेली माहिती कोणती व त्यावर कार्यवाही केली किंवा नाही, केली असल्यास कोणत्या प्रकरणावर कार्यवाही केली व कोणत्या प्रकरणाची कार्यवाही शासनाकडे चालु आहे, त्यांच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात असे नमूद केले आहे. अर्जदाराने मागितलेली माहिती अत्यंत ढोबळ स्वरुपाची आहे. त्यात कोणत्याही व्यक्ती विशेषाचा उल्लेख करण्यात आलेला नाही. दुसरी बाब म्हणजे एखाद्याने केलेली तक्रार किंवा तदनुषंगाने मागितलेली माहिती हा विश्वासाधारित दस्तऐवज असतो. असा विश्वासाधारीत दस्तऐवज देण्यास संबंधित व्यक्तीशिवाय अन्य कोणी मागितला असल्यास तो विश्वासाधारीत दस्तऐवज देण्यास संबंधित व्यक्तीची काही हरकत आहे किंवा कसे हे पडताळुन पाहणे इत्यादी माहिती नमुद केली नसल्यामुळे ती प्राप्त झाल्याशिवाय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार वरील प्रमाणे नाहरकत प्राप्त करणे शक्य होणार नाही आणि परिणामतः संबंधित मुद्याची माहितीही देता येणे शक्य होणार नाही."अपिलार्थीस एकूण ३४+७२ अशी एकूण १०६ पृष्ठांची माहिती देण्यात आली आहे.

अपिलार्थी आज रोजी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतलेली नाही, अशी कारणमिमांसा नमूद केलेली आहे व ₹३६६/- घेऊन अपूर्ण माहिती दिली आहे, असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. मूळ अर्जामध्ये माहितीचा कालावधी सन १९९५ ते २८ जानेवारी,२०१० असा नमूद केला असून विस्तृत अशी माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी

माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जावर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

तरीही जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद विहित मुदतीत दिलेला आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये माहितीची व्याख्या दिली आहे. माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात देणे अभिप्रेत आहे. प्रश्नार्थक/खुलासेवजा मुद्यांवर माहिती देता येत नाही. ही बाब विचारात घेणे आवश्यक आहे. मुद्दा क्र. ९ संदर्भात मागितलेली माहिती अधिनियमातील कलम 8(1)(j) नुसार देय होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली नेमकी व मोजकी माहिती मागणे माहिती अधिकार कायदा प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी अभिप्रेत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लाड नवनाथ भानुदास,रा.आदर्श कॉलनी, धोबीघाट,अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय,अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता,स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय

महाविद्यालय,अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख सत्तार महमद यावर,<br>रा. बीड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,<br>विभागीय कार्यालय, राज्य परिवहन, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक,<br>राज्य परिवहन, नांदेड विभाग, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, विभागीय कार्यालय राज्य परिवहन, नांदेड - श्री. मरदोडे गोविंद भुजंगराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभाग नियंत्रक,राज्य परिवहन, नांदेड विभाग, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०६.२०१०<br>(फेरसादर दि.०८.१२.२०१०) |

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन, नांदेड यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, अपिलार्थी यांनी मे, १९७२ ते मार्च,१९७४ या कालावधीतील त्यांच्या स्वतःच्या कामाच्या उपस्थितीबाबतची माहिती मागितली होती. सदरची माहिती त्यांच्या वेतनदेयकावरुन उपलब्ध होऊ शकते. तथापि सदरची माहिती अभिलेख्यांच्या वर्गीकरणानुसार तीस वर्षे कालावधीची असल्यामुळे उपलब्ध होऊ शकत नाही. अपिलार्थीस तसे कळविण्यात आले आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,राज्य परिवहन,नांदेड विभाग, नांदेड यांनी अपिलार्थीस यासंदर्भात दि १७.०५.२०१० रोजी कळविले आहे की, माहिती उपलब्ध होऊ शकत नाही ही बाब जन माहिती अधिकारी यांनी,विहित मुदतीत दि. १२.०४.२०१० रोजी कळविलेली आहे. त्याची प्रत जन अपिलीय अधिकारी यांना तसेच लेखाधिकारी यांना पाठविण्यात आली आहे. तसेच सदरील कालावधीतील वेतन चिठ्ठया उपलब्ध असल्यास त्या कार्यालयात सादर कराव्यात म्हणजे वेतन चिठ्ठयांवरुन हजर दिवस घेऊन ते प्रमाणित करुन देण्यात येतील, असेही कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख सत्तार महंमद यावर आगार प्रमुख, एस.टी.डेपो, बीड -४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,राज्य परिवहन नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. औटे दादाकिशन रामभाऊ,<br>रा.पिंप्री बु., ता.परळी वै.,जि.बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, पिंप्री (बु.),ता.परळी वै.,जि.बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत),<br>पंचायत समिती, परळी वै.,जि.बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१७१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. औटे दादाकिशन रामभाऊ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, पिंप्री (बु.),ता.परळी वै.जि.बीड - श्रीमती जाधव ए.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परळी वै.,जि.बीड - श्री. रोडेवार आर.एच. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, पिंप्री बु. यांच्या कार्यालयाशी संबंधित विस्तृत अशी माहिती चार मुद्यांवर मागितली आहे. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नसल्याचे दिसून येत आहे. सध्याच्या जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, पिंप्री (बु.),ता.परळी वै.जि.बीड या माहे ऑगस्ट,२०११ पासून कार्यरत आहेत. त्यांनी सुमारे २५० पृष्ठांची माहिती तयार करुन आज रोजी सोबत आणली आहे. ही माहिती आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी स्वीकारली. अपिलार्थी यांना विनामूल्य माहिती देण्यात आली आहे. तथापि सध्याचे ग्रामसेवक यांनी त्यांच्याकडे निधी नसल्यामुळे त्यांनी स्वतःच्या खर्चाने माहिती दिली आहे.

या प्रकरणी असे दिसून येत आहे की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही.सध्याच्या जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,पिंपरी (बु.),ता.परळी वै.,जि.बीड यांनी स्वतःच्या खर्चाने माहितीच्या झेरॉक्स प्रती काढून अपिलार्थीस दिलेल्या आहेत. या सर्व बाबी पाहता, झेरॉक्स प्रतींसाठी झालेल्या खर्चाची संपूर्ण रक्कम संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडून वसूल करुन सध्याच्या जन माहिती अधिकारी यांना त्यांनी या माहितीसाठी व्यक्तिशः खर्च केल्यामुळे त्यांच्याकडे वर्ग करण्यात यावी व ही बाब कार्यालय प्रमुख म्हणून गट विकास अधिकारी, पंचायत समिती,परळी वै.,जि.बीड यांनी पहावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वै, जि.बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. औटे दादाकिशन रामभाऊ,मु.पो.पिंप्री बु.,ता.परळी वै., जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, पिंप्री (बु.),ता.परळी वै.,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, परळी वै.,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वै, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
